
संजय बनसोडे
निसर परकथा

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# संजय लिंबाजी बनसोडे

लिखित

कथासंग्रह

# तिसर परन्या

# तिसर परन्या

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

तिसर परन्या (कथासंग्रह)

संजय लिंबाजी बनसोडे

कवी लेखक पत्रकार

रा. चोंढी ( खु ), ता. सेनगाव, जि. हिंगोली

हल्ली मुक्काम :

1195/ 002 नकुल गायकर बिल्डिंग

पाटील आळी, हनुमान मंदिर जवळ

घणसोली गाव, नवी मुम्बई 400701

मोबाईल नंबर : 9819444028

email id: sbansode40@gmail.com

blog id : sanjaylbansode.blogspot.in

facebook id : facebook.com/sanjay.bansode.31542

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान


www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २३ नोव्हेंबर २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.



"जग बदल घालूनी घाव


सांगून गेले मला भीमराव"...


# संजय लिंबाजी बनसोडे




1) "सम्यक वर्तमानकाळ" या मासिक वृत्तपत्राचे नवी मुम्बई प्रतिनिधी. (२०१७ ते २०१९)
2) गीतकार म्हणुन दहा गाणी आणि कथेतून साकारलेल्या दोन शॉर्टफिल्म .
3) "देशोन्नती" वृत्तपत्रात 100 पेक्षा अधिक कविता प्रकाशित.
4) "दैनिक सम्राट"मधे अनेक लेख प्रकाशित.
5) अनेक कवी सम्मेलनमधे सहभाग.
6) "त्रिरत्न सामाजिक संस्था" (कल्याण ) या संस्थेमार्फत " भीम लेखणी विचारमंच" या त्यांच्या साहित्यिक ग्रुपला "समाजरत्न' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.
7) 'अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलन' ठाणे या संस्थेतर्फे 'देऊ वादळाशी लढे' या त्यांच्या कवितासंग्रहात सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.
8) "कुष्ठरोगी दिन-दलित सेवा संघ"
9) "बौद्ध एकत्रीकरण "
10) "मातृभूमी सेवाभावी संस्थेच्या" वतीने कार्याची दखल घेऊन सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

## संजय बनसोडे यांची ई साहित्यतर्फ़े प्रकाशित पुस्तके








http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/yatal_sanjay_bansode.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/pinjaraa_sanjay_bansode.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/dushkali_vavtal_sanjay_bansode.pdf

## श्री संजय बनसोडे यांचे इतर साहित्य

१) देऊ वादळाशी लढे - कवितासंग्रह

२) पेटलेल्या माणसाची कविता - विद्रोही कवितासंग्रह

आगामी

पिंजरा भाग २ – कादंबरी लवकरच आपल्या भेटीला

माझ्या माय मराठीवर

आणि

साहित्यावर प्रेम करणाऱ्या

सर्व वाचक मित्रांना अर्पण

मनोगत.......

जीवन जगताना माणूस नेहमी दोन जगात वावरत असतो. एक खऱ्या, वास्तववादी जगात. आणि दुसरे त्याच्या कल्पनेतून साकार झालेल्या काल्पनिक पण त्याला हव्याहव्याशा वाटणाऱ्या जगात. काल्पनिक जगात त्याचे मन मालिक असते. आयुष्यात अधुरे राहिलेले स्वप्न तो या जगात त्या स्वप्नाची कल्पना करून पूर्ण करीत असतो. तो सतत , चालताना, काम करतांना, झोपताना ह्या काल्पनिक जगात रंगून जातो.

कधी कधी मला प्रश्न पडतो की माझ्या लेखणीतून साकार झालेल्या कहाण्याही अश्याच तर नाहीत ना.....!

पण जेंव्हा वाचक माझ्या कादंबऱ्या वाचून त्या कादंबऱ्यांची स्तुती करतात आणि सांगतात की, "अहो बनसोडे साहेब, ही कादंबरी वाचतांना मला माझं बालपण आठवलं. असं वाटलं की ही कहाणी माझ्या लहानपणचीच आहे."

जेंव्हा माझी लेखणी माझी न राहता वाचकाला ती स्वतःची वाटते या पेक्षा मोठे बक्षीस लेखकासाठी काय असणार ....?

असं बोलतात की आरसा खोटं बोलत नसतो. कारण, आरशात दिसणारं प्रतिबिंब हे त्या आरशा समोर असणाऱ्या व्यक्तीचं अगदी साफ असतं. अगदी तसेच माझे लिखाणही आपल्या समाजात घडत असलेल्या गोष्टीचेच प्रतिबिंब आहे.

ई-साहित्यावर प्रकाशित होणारे हे माझे चौथे पुस्तक आहे. आपले प्रेम असेच अबाधित राहो हीच मनापासून प्रार्थना करतो. ई-साहित्याच्या सर्व टीमचे मनापासून आभार, तसेच माझ्यावर प्रेम करणाऱ्या वाचक आणि जिवलग मित्रांचेही मनःपूर्वक आभार.

या नैतिक दुनियेत कळत नकळत असं काही अनैतिक घडून जातं की, माणसाच्या जीवनात एक नवीनच दुःख जन्म घेतं. अशाच काही आपल्याच आजूबाजूला घडत असलेल्या अनैतिक कहाण्या मी या कथासंग्रहात शब्दबद्ध केल्यात.

कहाण्या काल्पनिक असल्या तरी वाचकांना नक्कीच आवडतील.

संजय लिंबाजी बनसोडे

9819444028

# कथा अनुक्रम

जागल

यातना

भूक

अनैतिक

वनवास

रुपया

तिसर परन्या

# जागल

अमावस्येची भयाण काळोखी रात्र होती ती. सारं गाव सामसुम झोपलं होतं. मधेच एखाद्या सामटीतून कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज़ कानावर पडत होता, तर कधी टिटवीचा टिवटीवाट. अशा काळोख्या रात्री आपल्या सहा वर्षाच्या पोराचं बोट धरून सखी (सखुबाई ) झरझर पुढं पुढं जात होती. तिच्या डोक्यात असंख्य विचारांनी थैमान घातलं होतं. त्या विचारापुढं तिला ना अंधार कळत होता, ना रस्त्यात असलेलं ते गाव. चार पाच वेळा धरलेले बोट तिच्या मुलानी जोरजोरात हलवले तेंव्हा ती भानावर आली आणि आपल्या सहा वर्षाच्या कोवळया जिवाकडे बघून म्हणाली,

"काय बाळा,

काय झालं..... पाय गळून आले का???

काखत घेऊ का तूला...."

तेंव्हा तिचं सहा वर्षाचं पोर (चिंट्या ) रडक्या आवाजात म्हणाला...

"माँ..."

"काय सोन्या "

"मला लय भूक लागली आन् झोप पण यायली.

माँ, आपण या गावात झोपू ना, आजच्या दिवस?"

तेंव्हा सखी त्याच्या तोंडावर मायेने हात फिरवत म्हणाली,

" नाही माय...इथं कोण हाये आपलं....?

आपल्यानीच घराच्या बाहीर हाकलून दिलंय आता या परक्या गावात कोण थारा देईल आपल्यालं"

"माँ ...... मंग जायाचं कुठं?????

बाबानं पण आपल्यालं बाहीर काढलं आज मामाच्या इथं गेलतो त्यांनी पण घरात घेतलं न्हाही..."

"जिकडं पाय नेतील तिकडं.....आपल्यानं आपली साथ सोडली. पाहू हे पाय अन् नशीब आपल्याला कुठं नेऊन जाते ते "

गाव कधीच मागे गेलं होतं. माय अन् लेकरू सरळ जाणाऱ्या रस्त्याने झरझर पुढे जात होते. आजुबाजुला रानच रान अन् भयाण शांतता त्यात सर्वत्र काळाकुट्ट अंधार. सखीला काही समजत नव्हतं कुठं जायचं काय करायच ती फक्त पाय पुढेपुढे टाकीत होती पण डोकं मात्र असंख्य विचाराने ग्रस्त होतं. आपल्या सहा वर्षाच्या पोराला कधी कडेवर कधी पायी चालवत तो लांबच लांब जाणारा रस्ता कापीत ती पुढं पुढं जात होती.. आता तीही थकली, तिचे पाय आता पुढे जाण्यासाठी थरथरत होते. कुठेतरी थोडा विसावा घ्यावा असे तिला वाटत होते पण या अनोळख्या रानात कुठं विसावा घ्यावा इचुकाट्याचा.. चिंट्या मात्र आता रडायला लागला होता. त्याचे डोळे आपोआप लागत होते. इतक्यात रस्त्याच्या अर्ध्याक किलोमीटर खाली एका झोपडीत जळणारा कंदील दिसला. अन् सखी मनात विचार करू लागली,

"कुणाची तरी 'जागल' असेल ती...पण त्यो अशा अर्ध्या रात्री आम्हांला आसरा देईल का? का येडीबीड़ी समजून हाकलून लावेल.... तिथं एखादं कुत्र असलं तर आमचे लचके तोडल्याशिवाय राहणार नाही..."

तिच्याकडे दुसरा पर्यायच नव्हता आपल्या पोरालं काखेत घेऊन ती हिम्मत करून रानात घुसली आणि कंदीलच्या उजेडाच्या दिशेने एकएक पाऊल टाकीत त्या झोपडीकडे निघाली. ती जशी जशी त्या झोपडीच्या जवळ जात होती तसातसा तिला आज माहेरात घड़लेला प्रकार आठवत होता. तिला जेंव्हा नवऱ्याने घरच्या बाहेर काढले तेंव्हा सरळ ती आपल्या भावाकडे आली. भाऊ काहीतरी तोडगा काढेल, समाजातील काही प्रतिष्ठित नागरिकाला नेऊन नवऱ्याला समजावून सांगेल या भाबड्या आशेने.. पण तिच्या नवऱ्याने सखी माहेरात पोचण्या अगोदरच

घडलेला प्रकार तिच्या भावाला फोनवर सांगितला आणि गावात त्याचे सखीमुळे कसे नाक कापल्या गेले ते तेल मीठ टाकून सविस्तर सांगितले. त्यामुळे ती माहेरात आल्यावर कुणीच तिला बोलत नव्हते. तीने सरळ भावाच्या घरी जाऊन दरवाज्या ठोठावला.. त्या झोपडीच्या दिशेने जाताना हे सर्व चित्र तिच्या डोळयासमोर पुन्हा दिसत होते, ती विचार करता करता अचानक थांबली. तिला आपल्या पायात भयंकर आग झाल्यासारखे जाणवले. तिने लेकराला कडेवरुन खाली उतरवले आणि पाय वर करून बघितले तर तिच्या रबलाच्या चप्पलंतून आरपार होऊन तिच्या पायात भली मोठी सोयाबीनची धसाडी घुसली. कसलाही विचार न करता पायात घुसलेली धसाडी तिने हाताने काढली. तिचा पाय रक्तबंबाळ झाला होता. चप्पल घालून तशीच ती पुन्हा लंगड़त लंगड़त पुढेपुढे जात होती. झोपडी आता जवळ आली होती. बाहेर कंदील लटकला होता पण बाहेर कुणीच नव्हतं तिने लांबूनच आवाज़ दिला,

"कोण्ही हाये का इथं???"

पण काहीच उत्तर आलं नाही म्हणून ती जरा जवळ गेली. झोपडीला एक ताटवीचं कवाड होतं. तिने जवळ जावून ते ठोठावलं तसं तिला पुन्हा आजची माहेरातली आठवण झाली. असच तिनं माहेरात जाऊन आज सकाळी आपल्या भावाचं दार ठोठावले होते. तिचा दुखाने उर भरून आला होता. दार उघडल्या उघडल्या आपल्या जिवाभावाच्या, भावाच्या खुशीत हुंदके देत अश्रू गाळत सारं दुःख धुऊन काढावं असं तिला वाटलं, पण झाले उलटेच. भावाने दार उघडले तशी ती आत येण्याचा प्रयत्न करीत होती पण सख्या वहिनीने तिला बाहेरच थांबवले आणि म्हणाली,

"हे इज्जतदार लोकांचे घर आहे. सासरचे नाक कापून इकडे आल्या, आता आमच्या घराला काळं फासु नका...

तुम्ही केलेले काम माफ करण्याजोगं नाही. आम्हांला जगूद्या इज्जतीने इथे !

जा इथून मुकाट्यानं "

दादा वहिनेचे असे शब्द ऐकून तिच्या अंगावर काटाच उभा राहिला. एकच तिचा सहारा होता, तोही आता गेल्यासारखा तिला वाटला. दाटून आलेल्या कंठातून आवंढा गिळत ती भावाला आणि वहिनीला हात जोडून विनंती करीत म्हणाली,

"असं करू नका दादा वहिनी.. माझा काहीच गुन्हा नाही.

जरा ऐकून तर घ्या माझं "

अन् अचानक झोपड्यातून आवाज़ आला..

"कोण हाये बाहीर एवढ्या राती"

अचानक ती भानावर आली. क्षणात तिच्या डोळयावरची झापड उघडली आणि तिच्या लक्षात आले की ती अर्ध्या रात्री एका रानात विसाव्यासाठी मदत मागत आहे. आतला आवाज़ ऐकून ती थरथरत्या आवाजात म्हणाली,

"मी....

"मी कोण?????"

"मी सखी, रस्त्याने जात होती तुमची जागल बघून आली."

"इतक्या रातीची कुठं जात होती"

हे शब्द ऐकून तिला रडायला आलं. मोठा हंबरडा फोडून ती जोरजोरात रडायला लागली.

ते ऐकून झोपड्याचा ताटव्याचा दरवाजा बाजूला सारून गणा बाहेर आला. तिची अवस्था पाहून तो समजून गेला की, नक्कीच ह्या बाईला तिच्या घरच्यानी घरा बाहेर काढले. गणाही अशाच एका परिस्थितीतून बाहेर आला होता त्यामुळे त्याला तिचे दुःख कळायला जास्त वेळ नाही लागला. तो तिला प्रेमाने म्हणाला,

"बाई, रडू नका....अन् घाबरू नका.

अगोदर शांत व्हा ! "

तिला शांत करीत गणाने झोपड्या शेजारच्या तुराट्या गोळा करून मोठा जाळ केला. त्या जाळाच्या शेकाने दोघा माय लेकराला थोडी ऊब आली आणि गणाच्या प्रमळ बोलण्याने सखीला त्या अनोळखी रानात अन् भयाण अंधारात थोडा आधार मिळाल्या सारखा वाटला.

शेकोटी केल्यानंतर गणाने त्यांना प्यायला पाणी दिले तसे दोघा माय लेकराने घटाघटा पाणी प्यीले. पाणी पिल्यावर सखी हात जोडीत त्याला म्हणाली,

"पोरालं काही खायालं आशिल तर द्या !

पहाटपासून पोर उपाशी हाये..."

"तुम्ही बसा शेकीत मी आणतो वावरातून काहीतरी खायालं"

असं बोलून गणा उठला झोपड्याला टांगलेली कुऱ्हाड हातात घेऊन खालच्या वावरात गेला.

सखी शेकोटी जवळ चिंट्याला आपल्या मांडीवर घेऊन थापटत होती. तीचा, सासरी व माहेरी झालेला अपमान अजूनही तिच्या डोक्यातून जात नव्हता. ती इतकी भयाण संकटात असताना सुद्धा तिच्या डोक्यात विचारच गोंगावत होते. नवऱ्यानी बाहेर काढल्यावर ती आपल्या सख्या भावाकडे आली अन् तिला त्यांनी बाहेरच आडवले. ती हात जोडून त्यांना विनंती करीत होती पण ते ऐकायला तयार नव्हते. ती वारंवार तिच्या दादा वहिनीला विनवत होती,

"दादा, आता तुमच्या शिवाय मला आहे तरी कोण?

मही नाही पण मह्या लेकरावर तरी दया खा !

कुठे जाऊ मी आता.......!"

तिचे दादा वहिनी मात्र रागाने तिला बाहेर काढत आणि म्हणत,

"तु तुझ्या सासरच्या लोकांचे नाक कापलेस इथे राहून आमचेही नाक कापशील..."

तिच्यावर कुणीही दयामाया नाही दाखवली. ती ज्या घरा जवळ जात होती त्या घरातील लोक दरवाजा लावून घेत होते. शेवटी तिला माहेरातून बाहेर पडावे लागले. कुठे जायचे, कसे जायचे, कुणाकडे जायचे हे तिला काहीच समजत नव्हते. ती तडक रस्त्याने निघाली. रस्ता जिकडे घेऊन जाईल तिकडे ती जात होती.. शेकत असताना पाठीमागून खड़खड़ आवाज़ आला तसे तिने मागे वळून पाहिले. गणा आपल्या कवेत मावेल तेवढा टहाळ (हरभऱ्याची झाडे ) घेऊन आला. तो टहाळ त्याने त्या जाळात भाजला. भला मोठा हरभऱ्याचा भाजून हूळा झाल्यावर त्यांनी सखीला व चिंट्याला खायला सांगितला तसा दोघा माय लेकरानं वानरासारखा दोन्ही हातांनी हूळा खायाला सुरवात केली तो संपेपर्यंत ते थांबलेच नाही. हूळा खाल्ल्यावर सखीला थोडं बरं वाटलं तिनं त्या झोपडीत चिंट्याला झोपवले हळूहळू चिंट्या झोपी गेला. गणा बाहेरच शेकोटी जवळ ऊब घेत बसला होता. अचानक झोपडीच्या पाठीमागून सखीच्या कानावर चित्रविचित्र आवाज़ आला. 'ख्याक ख्याक' असा आवाज़ ऐकून सखी दचकली अन् बाहेर गणा जवळ येऊन म्हणाली,

"काय ओरडायलं हे....!"

गणा हसून म्हणाला,

"घाबरू नका ती खोकडं हाये.

रातीच्या येळला रानटी प्राण्याचे असे आवाज कानावर पडतात. मलं आता सवय झाली याची जागल करून करून. मला तर आता माणसाच्या आवाजापेक्षा हेच आवाज़ आपलेसे वाटतात."

"कुण्या गावचे तुम्ही...." सखीनं घाबरत विचारलं.

"गाव ...?

मी गाव कधीच सोडलं. गावात माणसं नाय जनावर राहतात."

सखी त्याच्या जवळ येऊन ऐकू लागली. लाकडे जळत होती तसा गणा ही ऊरातले जळते शब्द साठवून ठेवलेले ओठावर आणत होता. सखी मात्र निशब्द होऊन ऐकत होती. एका वर्षापूर्वी गणाचाही सोन्यासारखा संसार होता. एक बायको, दोन लहान लहान मुले, गावात इज्जत. गणा, गावात भेटेल ते काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होता. सर्व काही ठीक चालले होते. गणाच्या शेजारी त्याचा जिवाभावाचा मित्र जगन राहत होता. काही दिवसापूर्वीच त्यानी बायको सोबत पटत नसल्यामुळे फारकती घेतली होती त्यामुळे त्याला जेवायला गणा घरीच बोलवत असे. हळूहळू उलटेच झाले, गणाची दोस्ती कमी होत गेली आणि जगन व गणाच्या बायकोची दोस्ती वाढत गेली. गणा साधा भोळा माणूस. मित्राने पाठीत खुपसलेला खंजीर त्याला

दिसत होता पण तो काहीच करू शकत नव्हता. आता तर जगन अन् गणाची बायको भर दिवसाही एकमेकास भेटत. साऱ्या गावात या गोष्टीची चर्चा झाली. आता सारा गावच गणाची मजाक उडवत होता. त्या गावात आता गणाला राहणेही असह्य झाले होते. आणि एक दिवस अचानक संध्याकाळी कामावरून घरी आल्यावर गणाला त्याच्या घरी कुणीच दिसले नाही. गणाने कड़ी उघडून घरात बघितले तर घरातले सामान ही गायब होते. बाजेवर एक चिठ्ठी होती. गणाने ती उचलून त्यातला मचकूर वाचला. चिठ्ठी त्याच्या बायकोने लिहली होती. त्यात तिने स्पष्ट सांगितले होते की,

"मला शोधण्याचा प्रयत्न करू नका. मी आणि जगन मुम्बईला जावून आमचा नवीन संसार सुरू करीत आहोत. सोबत माझ्या दोन मुलांनाही घेऊन जात आहे."

ही चिठ्ठी वाचून गणाला अंतःकरणातून फार दुःख झाले पण त्याचा नाईलाज होता. त्याने हाताने आपल्या पायावर धोंडा मारून घेतला होता. सख्या मित्राने त्याचा असा घात केला होता. त्याला त्या गावात राहणे म्हणजे विस्तवावर चालण्यासारखे वाटत होते. शेवटी त्याने ते गाव सोडले आणि लांब निघून गेला. एका गावात सावकाराला जागलीसाठी एका माणसाची गरज होती. गणाने त्या कामाला होकार दिला व रात्रदिवस शेतीची राखण करू लागला. आता सावकाराचा गणावर पूर्ण विश्वास झाला होता. सावकार आता गणाच्या भरवस्यावर शेती ठेऊन बिनधास्त राहू लागला. गणा आता सर्व विसरून त्या रानात एक नवीन जीवन जगत होता. माणसांच्या दूर गावाच्या दूर, एकटाच.

सखीला हे सांगताना गणाच्या डोळयातून अश्रू ओघळत होते. तो डोळे पुशीत म्हणाला,

"तुम्ही फार लांबून पायी आल्या वाटतं !

झोपा आता थोडं, झोपड्यात जावून...."

"आणि तुम्ही "

"मी झोपतो इथंच, आगीच्या आडोशाला"

सखी झोपड्यात जाऊन निवांत झोपली तिच्या डोळयात दोन तीन दिवसाची झोप होती.

सकाळ झाली ते रान त्या सोनेरी किरणांनी न्हाऊन निघाले होते. सकाळी सकाळी माय लेकरं जागी झाले. त्यांच्यासाठी ही एक नवीनच सकाळ होती. सासर आणि माहेरच्या दूर एका अनोळखी रानातली.. उजाडताच रानातील पाखरं आपल्या घरट्यातून उठून पोटासाठी सैरावैरा धावू लागली. अन् रानातल्या पिकांवर बसून कोवळया उभ्या पिकाचा लचका तोडू लागली. गणा गोफण फिरवत त्यांना पिकांवरून हुसकावून लावत होता. ते बघून सखी मनातल्या मनात हसून म्हणाली,

"हे पोट बी ना.... कुणाला स्वस्त बसू देत नाही"

सूर्य वर येत होता. रात्री आलेल्या सखीचा चेहरा आता गणाला स्पष्ट दिसत होता आणि सखीला गणाचा.. सखीचे वय साधारण तीस बत्तीस वर्ष होते. सखी दिसायलाही सुंदर होती. सावळा चेहरा पण पाणीदार. गणा मनात विचार करू लागला,

"इतक्या सुंदर बाईवर का म्हणून ही पाळी आली असेल बर्......"

रात्री गणाची कहाणी ऐकून सखीलाही त्याची दया आली. तीही मनात विचार करू लागली,

" इतक्या चांगल्या नवऱ्याला सोडून जाणारी त्याची बायको किती वेडी असेल... नवऱ्याने मला इतके मारून सुधा मी त्याची साथ सोडत नव्हती पण घरातील व भावकितील सगळया लोकांनी जेंव्हा माझ्यावर आळ घातला अन् बाहेर काढले तेंव्हा मी मजबूर झाले जाण्यासाठी."

सखीनी भाकरी भाजी बनवून गणाला वाढून दिलं. गणा खूप दिवसांनी आज इतक्या सुंदर जेवण जेवत होता. जेवताना गणा म्हणाला,

"लय चांगलं जेवण बनवता हो तुम्ही....

पहिल्यांदाच मी इतक्या सुंदर जेवण जेवतोय."

सखी लाजली अन् "इश्श" बोलून बाहेर गेली. इतक्या वर्षात पहिल्यांदाच तिने केलेल्या स्वयंपाकाचे कुणी कौतुक केले होते. गणाला मनोमन वाटत होते की, आता सखीने इकडे तिकडे न भटकता इथंच रहावे, पण त्याची बोलण्याची हिम्मत होत नव्हती. चिंट्या मात्र खेळण्यात मग्न होता. तो त्या मोकळ्या रानात मनसोक्त उड्या मारत होता, झाडावर चढून डींक खात होता,

पक्षांसोबत गात होता बागडत होता, क्षणातच ते सारे त्याला आपलेच वाटत होते. खेळणाऱ्या बागडणाऱ्या चिंट्याकड सखी एकटक बघत उभी होती. ते बघून गणा सखी जवळ येऊन म्हणाला,

" तुम्ही कोण आहात, तुम्हाला घरच्यानी का बाहेर काढले, हे मला काय माहीत नाही आणि काही घेणेदेणेही नाही. पण तुमच्या दोघा माय लेकराकडे बघून वाटतं की तुमच्यावर खूप मोठा दुखाचा डोंगर कोसळलाय...

त्यामुळं माझी एक विनंती आहे, तुम्हाला जितक्या दिवस इथं रहायचे तितक्या दिवस निश्चिंत रहा."

हे ऐकून सखी त्याला हात जोडून म्हणाली,

"लय उपकार होतील तुमचे आम्हा माय लेकावर, तुम्ही थोडा दिवस आम्हा आसरा दिला तर...."

हे ऐकून गणा मनोमन खूप खुश झाला. तो हसत सखीला म्हणाला,

"मी गावात जाऊन तुमच्यासाठी काही सामान आणतो. मला दोन अडीच घंटे लागतील, तोवर थांबा तुम्ही इथ."

सखी त्याच्याकडे बघून म्हणाली,

"लवकर या... मी वाट बघते...."

गणा खांद्यावर रुमाल टाकून ऐटीत गावाच्या दिशेने निघाला. गणा दूरदूर जात होता. सखी मात्र त्याला बघतच उभी होती,

तो दिसेनासा होईपर्यंत...............

******************

# यातना

मूल जन्मल्यानंतर सर्वजण विचारात, ‘मुलगा झाला की मुलगी?’ फक्त त्या बाळाची आईच विचारते "माझे बाळ कसे आहे?"

तीन घंट्याच्या अथक प्रयत्नानंतर डॉक्टरच्या हातात एक गोंडस बाळ येतं. नऊ महीने त्या बाळामुळे आपल्या पोटात भ्रूण अवस्थेपासून ते प्रसूत होईपर्यंत असह्य कळा सोशीत वेदनेच्या कह्यातून मुक्त झालेली विमल,बाळाच्या रडण्याचा आवाज ऐकताच डॉक्टरला विचारते,

"मुलगा झाला की मुलगी?"

होय....एक आईच विचारते डॉक्टरला, मला मुलगा झाला की मुलगी? तेंव्हा डॉक्टरचे उत्तर येते

"मुलगी "

मुलगी हा शब्द ऐकताच विमलचा चेहरा सुन्न पडतो तिचे अंतर्मन धाय मोकलून रडत असते .प्रसूतीच्या वेळेस तिला जेवढ्या यातना झाल्या नाही त्याहून जास्त यातना तिला ‘मुलगी ’ हा शब्द ऐकून होतात.

त्याला कारण ही तसेच होते. एक मुलगी जेंव्हा एका गरिबाच्या घरात जन्मा येते तेंव्हा तिचे काय हाल होतात, या जगात तिला किती बेअदबीने जगावं लागते ते विमलला चांगलेच ठाऊक होते. डॉक्टरने नाळ तोडून बाळ साफ करण्यासाठी बाहेर नेले. विमल मात्र तिथेच पडून आपल्या भूतकाळात आणि येणाऱ्या मुलीच्या भविष्यकाळात गर्क झाली होती.

जातं कितीही उपटलेले असले तरीही त्यातून भरडाच बाहेर पडतो पीठ नाही . तसेच एका श्रमिकाने कितीही कष्ट केले तरी त्याच्या जमापूंजीत खुर्दाच असतो त्याचे नोटात रुपांतर कधीच होत नाही. आज कितीही स्त्री पुढे गेली तरी गावखेड्यातली स्त्री आजही या पुरुषप्रधान देशात स्वातंत्र्यासाठी हंबरडा फोडत आहे. आजही ती या आपदातून मुक्त करणाऱ्या मुक्तिदात्याची वाट बघत बसली आहे.

विमलचा जन्मही असाच एका मुलाच्या प्रतिक्षेत असणाऱ्या आई वडिलांच्या घरी झाला होता. मुलाच्या प्रतिक्षेत असलेल्या आई वडीलाची ही तीसरी कन्याच असते. बापाचे हातावरचे पोट. शेतात, गावात मिळेल ते काम करायचे अन् पोट भरायचे. वंशाच्या दिव्याची वाट बघत बघत तीन मुलीचा बोजा अंगावर पडला त्यांचे लग्न कसे करायचे? त्यांना हूंडा कुठून द्यायचा? या चिंतेत असलेला विमलचा बाप, हळूहळू दारूच्या आहारी गेला. दिवसभर मेहनत करून कमावायचे अन् रात्रभर दारू पिऊन दारूच्या गूत्यावरच पडून रहायचे. घरी गेला तर तीन मुलींच्या लग्नाची चिंता. त्यामुळे त्यांनी घरच सोडून दिले.

मुलांना सांभाळण्याची सारी जिम्मेदारी तिच्या एकट्या आईवर पडली. दरवर्षी दुष्काळाने पिंजून निघणारे गाव अन् त्या गावात रोज मजुरी करून एकाच्या जीवावर चार जीव पोसने तिच्या आईला असह्य झाले.

बोलतात ना, दुःख हे उखलाशी असते.पण विमलच्या कुटुंबाचा दुखाचा डोंगर सरता सरेना. पोटाला चिमटा देत अन् दुखाला आलिंगन देतच विमल व तिच्या बहिणी लहानाच्या मोठ्या झाल्या. आता कमावणारे आठ हात झाल्याने हळूहळू दुःखाचे रुपांतर सुखात परिवर्तित होत होते.उपाशी पोटी झोपण्याचे दिवस आता संपले होते. पण नियतिला ते मंजूर नव्हते. ऐन ज्वानीच्या उंबरठ्यात पदार्पण केलेल्या त्या तीन जीवाचे लचके तोडण्यासाठी गावातले गिधाडे टपूनच बसली होती.शेवटी त्या गिधाडाने डाव साधलाच, तालुक्याचा बाजार असल्यामुळे विमलची आई आणि विमल तालुक्याला गेल्या. त्यामुळे गावकूसाबाहेरच्या एकांत झोपडीत दोन

तरण्या तांड्या मुली आज एकट्याच आहेत याचा फायदा उचलत काही गावातल्या शैतानी वृत्तीच्या चांडाळानी अत्यंत क्रूरपणे त्या दोघीजणींवर बलात्कार केला. आणि तेथून पसार झाले. विमल आणि तिची आई घरी आल्यावर इभ्रतीला काळिमा फासणारी ही घटना कळली. घटना कळताच विमलच्या आईने सरपंच,पाटील आणि गावकऱ्या समोर न्यायासाठी पदर पसरला. पण बलात्कार करणारे प्रस्थापितांचेच मुले असल्यामुळे विमलच्या बहिणीनाच गलत साबित करून,आमच्या मुलांना नादाला लावून गावात ह्या वेश्याव्यवसाय चालवतात असे ठासून सांगत त्यांनाच गालबोट लावून बदनाम केले. तेंव्हापासून साऱ्या गावाने त्या घराला वायाळ टाकले त्यांची रोजमजुरी बंद केली गावातून त्यांचे राशनपाणी बंद केले. बलात्काराची घटना घडली तेंव्हापासून विमलच्या आईने खाट पकडली. या घटनेमुळे विमलच्या आईला मोठा धक्का बसला तिने खाणे पिणे बंद केले तिला जगण्यापेक्षा मरणाला कवटाळनेच बरे वाटत होते. घरात बीमार असलेले आई गावांने टाकलेला बहिष्कार,यातून कसा मार्ग काढावा हे विमल व तिच्या बहिणीला कळत नव्हते. गाव सोडून बीमार आई सोबत स्थलांतर तरी कसे करावे?

थोडेफार घरात राशन होते तेच थोडे थोडे करून गावातच राहण्याचा निर्णय त्यांनी घेतला. नऊ दहा दिवसातच अन्न पाण्यावासून बीमार असलेली विमलची आई गतप्राण झाली. आईची अंत्यविधी झाल्यावर त्या तिघी बहिणीने गाव सोडण्याचा निर्णय घेतला. त्यांनाही आता चांगलेच माहिती होते की, गावातील राक्षस वृत्तीचे माणसे आपल्याला सोडणार नाहीत. पण जायचे कुठे? बाहेर आपले कुणीच नाही. रोज रोज गावात मरण्यापेक्षा एखाद्या मोठ्या शहरात स्थलांतरीत होऊन पुन्हा नव्या उमीदीने जगू. असा त्या दोघींनी निर्णय घेतला, आपले तर मात्रे झाले पण विमलचे असे होऊ द्यायचे नाही. शहरात जाऊन मिळेल ते काम करू आणि विमलचे मोठ्या थाटामाटात लग्न करू. शेवटी नव्या जीवनाच्या शोधात त्यांनी मुम्बई गाठली. मुम्बई कुणाला उपाशी मारत नाही त्यामुळे त्याही आल्या जीवाची मुम्बई करायला.

एका झोपड़पट्टी जवळील फुटपाथवर छोटेसे झोपडे बांधून तिथे विमलला ठेऊन त्या रोज जात असत कामाच्या शोधात पण काम काही केल्या त्यांना भेटत नव्हते. त्यांनीही हार मानली नाही रोज या ना त्या परिसरात जावून त्या कामाचा शोध घेत होत्या. घार उंच आकाशात उडून अफाट पसरलेल्या जमिनीवर लपलेल्या पक्षांवर नजर ठेऊन झेप घेते व शिकार करते. असेच काही शिकारी, वेश्या व्यवसायांचे दलाल लेडीज डान्स बारचे दलाल यांचीही अफाट पसरलेल्या, माणसांनी गजबजलेल्या गर्दीत अचूक वेध घेऊन आपली शिकार न्याहळीत असतात. अशाच शिकाऱ्याची नजर या दोन बहिणीकडे जाते. तो दोन दिवस त्यांचा पाठलाग करतो त्यांची सर्व माहिती काढून त्यांना काम मिळेल पण डान्स बार मधे कस्टमरला खुश ठेऊन डान्स करावा लागेल असे त्यांना त्यांच्या मजबूरीची नस पकडून अगोदरच सांगतो व या कामासाठी किती पैसा मिळेल हेही सांगतो. एक महीना चारजण काम करूनही जितका पैसा येत नव्हता तितका एका दिवसात कमावयाला मिळतो हे बघून त्यांना नवलच वाटले. इज्जत नावाचे पांघरूण कधीच आपल्या अब्रूवरून फेकल्या गेलं होतं हेदोघींनाही ठाऊक होतं. आता फक्त जगायचं ते विमल साठीच. त्यामुळे त्यांनी या कामाला लगेच होकार दिला. डान्स आणि त्या दोघीचा दूरदूरपर्यंत संबध नव्हता तरीही पोटाच्या आगीसाठी व विमलसाठी "माय नेम इज शीला" "मुन्नी बदनाम हुई "अशा गाण्यावर नाचून वेगवेगळया मर्दासोबत त्या आपल्या शरीराचा सौदा करीत होत्या.थोडा पैसा जमा झाल्यावर त्यांनी थोड्या चांगल्या झोपड़पट्टीत भाड्याने घर घेतले. त्या दोघीनी रात्रभर बारमधे खपायचे आणि विमलने फक्त घरच सांभाळायचे. अशातच शेजारी असलेल्या मनोजसोबत तिचे प्रेम जुळले. विमलच्या दोघी बहिणीनाही मनोज पसंद पडतो. वेळ न घालवता हॉल बूक करून विमलचे मोठ्या थाटात त्या लग्न लावून देतात. लग्न झाल्यावर त्यांना त्यांच्या शेजारीच एक खोली भाड्याने देतात. लग्नाला तीन चार महीने झाल्यानंतर विमलला दिवस जातात आणि अचानक मनोज गायब होतो तो कायमचाच. तिघीही पोलीस स्टेशनला जावून मनोज बेपत्ता आहे म्हणून तक्रार नोंदवतात. पोलीस मनोजचा फोटो मागतात. विमल तिच्या

बॅगेत असलेला फोटो देते तो फोटो बघून पोलीस परेशान होतात. कारण, तो एक गुन्हेगार असतो. आतापर्यंत त्याने चार मुलींना असेच फसवलेले असते विमल हि त्याची पाचवी शिकार असते.

विमलचे मूल घेऊन तिच्या दोन बहिणी तिच्या जवळ येतात अन् विमलला म्हणतात.बघ तुझं बाळ सेम तुझ्यावरच गेलं.

बाळाला बघून ती हसत त्यांना म्हणते, होय माझ्यावरच गेलं पण त्याचं जीवनही माझ्यावर जाऊ नये .....

**************

# भूक

माणसाने खचाखच भरलेली ती मुम्बई लोकल. चुंबकाला लोखंड चिपकावे तशी माणसे एकमेकास चिपकलेली होती. दरवाज्याच्या बाहेर असणारे माणसे भेटेल ते लोकलचे पार्ट पकडून आपला जीव मुठीत घेवुन पुढच्या स्टेशनची वाट बघत होती. शेजारुन सुसाट वेगाने जाणाऱ्या गाड्याने ते हड़बड़त होते कानाजवळून झूsss करीत एखादां पक्षी जावा तशा गाड्या जात होत्या.

मधमाशाच्या मोहळा प्रमाणे एकमेकाला चिपकलेले असतांना सुद्धा, त्या लोकलमधे भयाण शांतता होती.रोज त्याच लोकलने प्रवास करणारे ते प्रवासी, मात्र एकमेकांचे अनोळखी चेहरे. वर लटकणाऱ्या कडींना पकडून सर्वच आपआपल्या विचारात मग्न होती. साऱ्यांचा चेहरा भेसुर.वाटत होता. कुणी एकसारखे घड्याळात बघून तोंड वाकडे करीत असे.कदाचित त्याचा रोजचा शेडयुल्ड बिघडून लेट झाले असावेत. कुणी रात्रीची उरलेली झोप समोरच्याच्या खांद्यावर मान टाकुन काढत होते. कुणी त्या गर्दीतून हात वर काढून आपला मोबाईल बघत होते.

इतक्यात लोकलच्या स्पिकर मधून सूचना येते,

"अगला स्टेशन कुर्ला, कृपया उतरते समय पलाट फॉम पे ध्यान दीजिए "

हे ऐकताच सर्वांच्या नजरा दरवाज्याकडे गेल्या .सर्वच एकमेकास दरवाज्याकडे ढकलत होते. अगोदरच फुल्ल प्रेशर मधे दरवाजात लटकुन प्रवास करणारे त्यांच्यावर किंचाळत होती.

"अरे रूखो भाई, स्टेशन तो आने दो.मरवावोगे क्या?"

पण त्यांचे कुणी ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. लोकल प्लॉटफॉर्म वर येत होती तसा तसा तिचा वेग मंदावत होता. शेवटी लोकल कुर्ला स्टेशनला थांबली अन् पाण्याने तुडुंब भरलेल्या धरनाचा बांध फूटावा आणि त्यातून आपल्या कवेत येईल ते घेऊन पाणी सुसाट वेगाने पळावे तसे त्या लोकल मधून माणसे बाहेर पळत होती आणि जिन्यावर चढत होती. जिन्याभोवती आता प्रचंड गर्दी झाली.समोर बाई आहे का माणूस हे कुणी बघत नव्हते सर्वच एकमेकाला ढकलून पुढे पुढे जात होते. वरून खाली प्लॉटफॉर्मवर येणाऱ्याचीही तिच अवस्था होती. वरचे एकमेकास पुढेपुढे लोटत खाली येत होते. आणि खालचे वर जात होते. जिन्यावर चढण्यासाठी खाली रांगच रांग लागली होती त्यामुळे जिन्याभोवती तणावाचे वातवरण झाले होते. खालून वर जाणाऱ्यांनी जिन्याच्या खालच्या तोंडाला गर्दी केली होती आणि वरून खाली लोकल पकडायला येणाऱ्यांनी जिन्याच्या वरच्या तोंडाला गर्दी केली होती. हा सारा कल्लोळ बघून दम धरून बसलेल्या बैल ससाण्याने त्या गर्दीतली एक शिकार हेरली.आणि शिकार करण्यासाठी तो त्या गर्दीत शिरला. आपले हात समोरच्याच्या पाठीवर ठेवून त्याला पुढेपुढे रेटणाऱ्या त्या लोकांचे एकच लक्ष होते लवकरात लवकर स्टेशन बाहेर पडायचे. आणि त्यांच्या पाकीट अन् मोबाईलवर लक्ष होते नुकत्याच मिशाचे खूंट फुटणाऱ्या अब्दुलचे. अब्दुल नुकताच एका चोरीच्या केसमधे सहा महिन्याची सजा भोगून आला होता आणि बाहेर येताच त्यांनी पुन्हा तोच धंदा चालू केला पाकीट मारीचा.

तो हळूच त्या गर्दीत शिरला आणि चलाखीने एकाच्या पाठून पँटीत हात घातला आणि पाकीट काढले. आणि बाजूला झाला दुसऱ्याच्या पँटीत हात घातला पाकीट काढले तिसऱ्याच्या पँटीत हात घालताच त्याने त्याला रंगेहात पकडले आणि चोर चोर म्हणून बोंब ठोकली. अब्दुल मात्र त्याचा हात हिसकावुन अर्ध्या जिन्यावरून उडी मारून पसार झाला.

आज खूप महिन्यानंतर त्याने चांगला हात मारला. स्टेशनच्या बाहेर येऊन त्यांनी मुतारीच्या आडोशाला जावून ते दोन पाकीट चाळले.त्यातली रोख रक्कम आपल्या फाटक्या जीन्सच्या खिशात घातली अन् तडक आपल्या घरचा रस्ता धरला.

रस्त्यावर चालण्यासाठी बनवलेल्या फुटपाथच्या शेजारी एका पुलाच्या आडोशाला त्याचे पाल लावलेले घर. घरात दोन्ही हात नसलेला बाप जो सिग्नलवर भीक मागून कुटुंबाचे पोट भरत असे. सात भावंडं आणि त्याला सांभाळणारी त्याची अम्मी.

अख्या मुम्बईची घाण वाहून नेणारे ते भले मोठे गटार आजुबाजुला दुर्गंधीचे साम्राज्य बाजूलाच एक खाटीकखाना त्या खाटीक खाण्यात कापलेल्या कोंबड्याचे पंख अन् आतडे फेकलेल्या कचऱ्या मधून कोंबड्यांची आतडी गोळा करून अब्दुलची अम्मी त्या सर्वांच्या पोटाची व्यवस्था करीत असे.

आजही त्याच्या अम्मीने त्या फुटपाथच्या शेजारी तीन दगड मांडून चुल पेटवली त्यावर भगूल ठेऊन त्यात ते कचऱ्यामधून गोळा केलेले आतडे टाकून चुलीला जाळ लावला. त्या चुली शेजारी त्याचे सात भाऊ एखाद्या भुकेल्या कुत्र्यासारखे लाळ गाळत ते आतडे शिजण्याची वाट बघत होते. त्यांच्या अंगावर बाराही महीने कपड़े नसल्याने त्याचे शरीर जनावराच्या चामड्यासारखे जरगट झाले होते. नाकातून गळणारा शेंबूड ओठापर्यंत येऊन धुळीने माखला होता. त्यांची केस कित्येक दिवस आंघोळ नसल्यामुळे कडक होऊन चित्रविचित्र दिसत होती. येणारा जाणारा त्यांच्या दहा हात लांबूनच जात होता. त्यांची कुणाला दयाही येत नव्हती. कशी येणार, ती माणसे थोडीच होती. धर्माने सांगितले प्राण्याला जेवण दिल्याने धंदा वाढतो म्हणून शेटजी भटजी सकाळी उठल्या उठल्या मोकाट कुत्र्याला जे गोर् गरीब मुलांना मिळत नाही, ते पारले जी बिस्किट खाऊ घालतात. कबूतराला चनेफूटाने देतात पण एखाद्या गरीबाच्या,भिकार्याच्या मुलाला कधी बिस्किट द्यायचा विचारसुद्धा त्यांच्या मनाला शिवत नाही.

खरच जर धर्माने सांगितले असते की गरीबांच्या मुलांना पोटभर जेवण दिल्याने धंद्यात भरभराट होते तर आज आपल्या भारतात, नव्हे हिंन्दुस्तानात कुणी उपाशी पोटी झोपले नसते.

अब्दुलच्या मम्मीने साऱ्याला फुटक्या जर्मनच्या ग्लासात थोडा थोडा रस्सा वाढला. तेव्हड्यात अब्दुल तिथे आला.अब्दुल आल्यावर सर्वच भावंडे खूष होऊन नाचत होती.

"भाई जान आ गया "म्हणून आनंद व्यक्त करीत होती. अब्दुल आल्या आल्या त्याची अम्मी म्हणाली,

"अब्दुल, आज कुछ हात लग्या की नही "

"लग्या अम्मी

बहुत तगडा हाथ मारा आज मैने

ज्या राशन लेके आ

आज सब जन भरपेट रोटी खायेगे "

असे म्हणून खिशातले पैसे काढून त्यांनी अम्मीजान कडे दिले.ते पैसे बघून अम्मीजान चकित झाली.

"या अल्ला

इतना सारा पैसा

ये पैसा तो हमारा एक महीना पेट भरेगा !"

"हा अम्मीजान तु ज्या राशन लेके आ

बहुत दिनसे मेरे भाईयोने रोटी खाया नही.

मुर्गी का आतडी खाके जी रहे हैं "

आज कित्येक दिवसांनंतर त्या कुटुंबात आनंद नाचत होता. पण हा आनंद जास्त दिवस नव्हता.

पुन्हा अब्दुलला पोलीस पकडणार

पुन्हा अब्दुल जेल मधे जाणार पुन्हा सर्वांना कोंबड्याचे आतडे खाऊन उपाशी झोपावे लागेल

************************

# अनैतिक

एक गृहस्थ, ज्याने आपल्या परिवारासाठी आणि आपल्या पोरा बाळासाठीच आपले जीवन अर्पण केले होते.

लग्नाला आठ वर्ष उलटून गेली होती. बायको व त्याच्यातला प्रेम नावाचा पंखा आता मोडकळीस येऊन भंगारात जमा झाला होता. आता तो पंखा त्याने चालू करण्याचा प्रयत्न केला तर तो पंखा त्याला प्रेमाची हवा न देता शॉकच देत होता.

प्रेमाचं सार त्याच्या जीवनातून कधीच इतिहास जमा झाल होतं.

आता त्याचं त्या सूर्यासारखे रोजचे जीवनचक्र चालू होते. रोज वेळेनुसार उगवायचे आणि सायंकाळी मावळायचे.

त्याचप्रमाणे, रोज सकाळी उठायचे. आंघोळ करायची. कपड़े घालून ऑफीसला जाण्यासाठी तयार व्हायचं आणि डबा होईपर्यंत बायकोची कटकट ऐकायची.

वाढती महागाई, घरात अपुरा पडत असलेला त्याचा पगार. बायकोची नवनवीन सामान घेण्याची ईच्छा. मुलांचे आताचे स्कुल बदलून नवीन मोठ्या स्कूलमधे टाकण्याची ईच्छा.

हे सारे ऐकून सकाळी सकाळीच त्याच्या डोक्याचे दही होणे चालू होत होते. तसेच डोके घेऊन तो ऑफीसला पोचत होता. ऑफीसला गेल्यावर त्या दही झालेल्या डोक्यात बॉस नावाच्या लाल भडक चटणीचा तड़का बसून त्या तड़क्याची आग त्याच्या पायापासून मस्तकापर्यंत जात असे.

संध्याकाळपर्यंत त्याची अवस्था त्या पावसाळ्यात पैदा होणाऱ्या दुधी केकड्या प्रमाणे होत असे.

चुकून ही कुणी त्याच्या शरीराला बोट लावले तर ते बोट त्याच्या शरीराच्या आरपार जाईल !

पहाड़ासारखा माणूस पण पूर्ण अवसान गळून गेलेला.

अशा अवस्थेत तो संध्याकाळी घराचे दार वाजवतो आणि दार उघडल्यावर त्याच्या बायको सोबत त्याच्या मुलांचेही त्याच्यावर शब्दरूपी आक्रमण होते.

असे बिना चवीचे त्याचे जीवन चालूच असते. आता त्यालाही या आळणी जीवनाची सवय झाली होती.

उंबराच्या किड्यांना माहीत असते आपले जीवन हे या छोट्याशा उंबरातच आहे. कितीही बाहेर जाण्याचा प्रयत्न केला तरी आपला प्रयत्न असफलच.

म्हणून ते बाहेरच्या दुनियेची आशा न करता त्या उंबरातच सुखी राहण्याचा प्रयत्न करतात.

हाही त्यांच्याप्रमाणेच त्या दुखाने बरबटलेल्या जीवनातच जगत होता.व आपली स्वप्ने त्यागून आपल्या बायका, पोरांच्या स्वप्नांसाठी रात्र दिवस धडपड करीत होता.

पण अचानक त्याच्या जीवनात एक आशेचा अंकुर जन्म घेतो. त्याच्या जीवनाच्या काळ्या अंधकारात अचानक LED लाईट पेटतो.

त्याच्या प्रेम नावाच्या मोडलेल्या लाकडाच्या झोपड्या समोर अचानक प्रेमाच्या सीमेंट विटा येऊन पडतात. व त्याचा भंगारात पडून असलेला प्रेम नावाचा पंखा पुन्हा जोरजोऱ्यात फिरू लागतो.

कारण,

त्याच्या घरा शेजारी एक नवीन सुंदर पाखरू रहायला आलेले असते. आणि त्या सुंदर पाखरानी याच्या प्रेमाचा होकार कबूल केलेला असतो.

पुन्हा एकदा तो प्रेमात तल्लीन होतो. आता त्याला कशाचीही गरज नसते. तो आता बायकोची भणभण, मुलांची कटकट, बॉसच्या शिव्या, वाढती महागाई आनंदात झेलत असतो.

कारण, त्याला आता जीवन जगण्याची एक नवसंजीवनी मिळालेली असते. त्यातच तो बेधुंद होऊन जीवन शोधतो.

दुनियाची पर्वा न करता.

ते दोघे आता एकमेकाचे जीव की प्राण झालेले असतात.

ते दोघे आता एका नव्या रस्त्याने चाललेले असतात.. तो रस्ता अरुंद होता. बदनामीने बरबटलेला होता.

ते एका भरकटलेल्या रस्त्याने जात होते. त्या रस्त्याला कुठलीही दिशा नव्हती त्यांनी बदनामीचा दिशाहीन रस्ता पकडला होता.

कधीतरी याच्या बायको समोर आणि तिच्या नवऱ्या समोर या दोघांचे पितळ उघडे पडणारच, याची त्या दोघांनाही जाण होती.

तरीही ते दोघे दुनियाची पर्वा न करता. एका नवीन दुनियेत रंगून गेले होते. त्या नवीन दुनियेला येथील सु-संस्कृत लोकांनी "अनैतिक" हे नाव ठेवले होते. पण त्यांना काय फरक....

*********

# वनवास

"अहो, गाडी थांबवा ड्रायव्हर साहेब.....गाडी थांबवा !"

गाडीच्या आडवी येत एक महिला आपल्या सहा महिन्याच्या बाळाला घेऊन ड्रायव्हरला विनंती करीत होती.

एमर्जेन्सी ब्रेक दाबून ड्रायव्हरने गाडी थांबवली, तसे गाडीमधे बसलेले सर्व प्रवासी अचानक समोर येऊन त्यांचे डोके समोरच्या सीटवर आदळले.

"अरे पागल हुआ क्या ड्रायव्हर..? मारने का क्या हमकू !

पहिलीच गड्डे का रस्ता और तुम अचानक ब्रेक माररा है..!"

बांगड्याचं पेटारं आपल्या मांडीवर घेऊन पाठीमागच्या सीटवर बसलेला अब्दुल कसार ड्रायव्हरला ओरडून म्हणाला...

"अरे मै क्या करू अब्दुल चाचा.. साली सामने एक औरत खड़ी है अपने बच्चो को लेके.. "

ड्रायव्हरने बसमधून मान बाहेर काढली व त्या महिलेला बघून ओरडला...,

"ओ बाई.. मरायचं काय एसटी पुढं..! कशाला आडव्या येता चालू गाडीच्या?"

"साहेब गाडी हिंगोलीला चालली का??"

"चालली पण तुम्हांला घेऊ शकत नाही .. गाडी फक्त बसस्टेंड वरचेच प्रवाशीच घेते येथे आडरानी घेऊ शकत नाही"

असे बोलून ड्रायव्हरने गाडी स्टार्ट केली त्यावर पाठीमागचा अब्दुल पुन्हा ओरडला,

"अरे जाने दो ड्रायव्हर उसपर नही तो उस बच्चो पे तो तरस खावो. कन्डाक्टर दरवाजा खोलो और लेलौ उस बच्ची कु "

हे ऐकून तिकीट मास्टरने दरवाजा खोलला व तिला आत घेतले. तिने आपल्या चिमूकल्याला उन्हाच्या झावा लागू नये म्हणुन पदराआड दडवले होते. बसची पायरी चढून ती वर आली. समोरची एक सीट खाली होती त्या सिटेवर जाऊन ती बसली. ती खूप थकलेली वाटत होती. साऱ्या अंगावर माराचे लालभडक व्रण दिसत होते. कानातून रक्तस्त्राव होत होता. हे बघून तिच्या शेजारी बसलेला, तिच्या थोडा लांबच सरकला. समोरच्या सीटवर बसल्यानंतर तिने एक नजर बसमधे बसलेल्या सर्व प्रवाशांवर मारली. आपल्या गावचे कुणी नाही हे बघून तिने सुटकेचा श्वास टाकला. खड्डयाच्या रोडने गाडी आदळत आपटत सुसाट पळत होती. सारे प्रवासी फक्त

तिच्याकडेच बघत होते. कोण ही बाई? इतक्या रणरणत्या उन्हात कोठे जात असेल आपल्या चिमूकल्याला घेऊन? रक्त निघेपर्यंत हिला कोण मारले असेल? गाडीतील सर्व प्रवाशी तिच्याकडे बघून मनात विचार करीत होते पण तिला बोलण्याची हिम्मत कुणी करीत नव्हते. तीही कुणाकडे न बघता कसल्यातरी विचारात गर्क होऊन चुपचाप बसली होती. इतक्यात अचानक तिचे बाळ झोपेतून उठून रडायला लागले तशी ती भानावर आली. सकाळपासून तिने आपल्या बाळाला दूध पाजले नाही हे तिच्या लक्षात येताच तिने आपल्या ब्लाउजचे खालचे दोन बटन खोलून पान्हा बाळाच्या तोंडात दिला व आपल्या पदराने पान्हा व बाळ पुन्हा झाकून घेतले. हे बघून थोड्यावेळा अगोदर तिच्यावर दया दाखवणाऱ्या नजरा आता वासनेने तिच्याकडे बघत होत्या. तिचे बाळ दूध पीत होते अन् दूध पितांना झाकलेला पदर ओढून तिचा पान्हा उघडा करीत असे. दिसणारा तिचा पान्हा ती पुन्हा झाकत असे, तिच्यावर खिळलेल्या त्या वासनाधीन नजरा तिच्या काळजात अग्नितांडव करीत होत्या. पण ती चुपचाप मान खाली घालून आपल्या बाळाला दूध पाजत होती कारण, तिला तेंव्हा इज्जती पेक्षा तिच्या बाळाची भूक महत्वाची वाटत होती. माळसेलू आली अन् गाडी थांबली. बस मधील काही प्रवासी उतरले काही चढले, गाडी खड़ खड़ खड़ करीत पुन्हा निघाली. तिकीट आणि पैशाचा हिशोब करीत असलेला तिकीट मास्टर आपल्या जागेवरुन उठला आणि नवीन प्रवाशांची तिकीट फाडायला लागला. ते बघून आकाशात अचानक वीज चमकावी अन् त्या आवाजाने काळीज चीरावे तसे तिला झाले. कारण तिच्याकडे एक रुपयाही नव्हता, आता हिंगोलीचे तिकीट फाडायचे कसे??? तिकीट मास्टर जसा जसा तिच्या जवळ येत होता तशी तशी तिची छाती धडायला लागली. तिकीट मास्टर तिच्याजवळ येऊन म्हणाला,

"बोला बाई, कुठं जायचं.."

"मलं हिंगोलीलं जायचं !"

"द्या, पंचवीस रुपये द्या..."

"मह्याकडं पैसे नाहीत साहेब"

"काय...!

पैसे नाहीत?? मंग चढली कशालं.."

टिकट मास्टर रागाने तिला म्हणाला...

"साहेब येउद्या हो मलं हिंगोलीलोक.. "

ती हात जोडून तिकीट मास्टरला विनंती करत होती..

"ओ बाई... ही एस टी काय मह्या बापाची नाही फुकट घेऊन जायलं"

गाडीत तिकीट मास्टरचे ओरडणं ऐकून पाठीमागच्या सीटवर बसलेला अब्दुल चाचा झोपेतून जागा झाला,

"अरे क्या हुआ कन्डाक्टर....? किसके साथ झगड़ा कर रहे हो? "

साठ पासष्ट वय असलेल्या अब्दुल चाचाचे रोज त्या एसटीने गोरेगाव ते हिंगोली येणे जाने होते त्यामुळं तिकीट मास्टर आणि ड्रायव्हरचे रोजचे संबध होते. गाडीत कुनाचेही भांडण झाले की अब्दुल चाचा मध्यस्थी करीत..

"अरे अब्दुल चाचा, वो जवला और सेलू के बीच में आपने ये औरत कु लेने के लिए बोला था ना, अब वो पैसा नही दे रही है"

"रुक जा, मै आता उधर.."

असे बोलून अब्दुल चाचाने आपल्या मांडीवरचे बांगड्याचे पेटारं बाजूला ठेवलं अन् समोर बसलेल्या त्या बाईकडे गेला. तिची अवस्था पाहून त्याने तिची मजबूरी ओळखली आणि खिशातून पंचवीस रुपये काढून तिकीट मास्टरला म्हणाला,

" इसको हिंगोली का तिकीट दे दे "

"आप भी ना चाचा, किसिको भी मदत करते हो !

मुझे क्या , पैसेसे मतलब..."

तिकीट मास्टर तिकीट फाड़तो आणि तिला देतो.

एक अनोळखी माणूस, जातीचा ना पातीचा तरीही बापासारखा धावून आला. हे बघून तीने अब्दुल चाचाचे मनोमन आभार मानले.

"किधर कु जाने का बेटा...?"

अब्दुल चाचाने प्रेमाने तिला विचारले. ते ऐकून ती एक शब्दही न बोलता चुपचाप आपल्या बाळाला थापटत झोपवीन्याचा प्रयत्न करीत होती. हे बघून अब्दुल चाचा पुन्हा आपल्या सीटवर जावून बांगड्याचं पेटारं घेऊन बसला. गाडी जशी जशी पुढे जात होती तसे तसे तिला आज तिच्या घरी घडलेले डोळ्यासमोर दिसत होते. ते आठवून तिला असेच वाटत होते की, अद्याप ही तिला मारहाण चालूच आहे. कुणीतरी आपला पाठलाग करीत आहे. या भीतीमुळे ती थरथरत होती. कुणी गाडीत तर नसेल ना लपून बसले? मी सुखरूप माझ्या मायबापाच्या घरी जाईल ना? कां मधेच मला सासरची लोकं अडवून मारतील? बाळाच्या अंगावर टाकलेला पदर ती डोक्यावर घेत आपला चेहरा लपवण्याचा प्रयत्न करीत होती. सकाळपासून तिच्या पोटात अन्नाचा एक कणही नव्हता. पण तिला भुकेची अजिबात चिंता नव्हती. गाडी आता हिंगोली वाशिम हायवेवर आली होती. खड्यात आदळत आपटत असलेल्या गाडीने हायवेवर आता वेग धरला होता. तिने हळूच आपला पदर खाली करीत खिडकीमधून बाहेर डोकावले. गाडी वेगाने गावे, राने पालथे घालीत हिंगोली जवळ करीत होती. जशी जशी हिंगोली जवळ येत होती तशी तिला अजून एक चिंता खात होती. ती म्हणजे हिंगोली वरून आपल्या माहेरात जायचे कसे? या गाडीत एकजण धावून आला पण प्रत्येक वेळी थोडंच कुणी धावून येईल अन मला माहेरी

जाण्यासाठी पैसे देईल. जाऊद्या काही हो पण माझी त्या नरकातून तर सुटका झाली. आता जर मरण आलं तरी आनंदानं स्विकारीन. मी मेल्यावर माझ्या बाळाचं काय? नाय नाय मला जगायचं ! माझ्यासाठी नाही तर माझ्या बाळासाठी. एक ना अनेक विचारांचे काहूर तिचा डोक्यात माजले होते. तितक्यात अचानक ड्रायव्हरने वेग कमी करीत गाडी थांबवली तशी ती खाडकन जागी झाली. तिकीट मास्टर गाडीची घंटी वाजवत म्हणाला,

"चला, शेवटचा स्टॉप."

"अरे आ गया हिंगोली बसस्टँड? "

सर्वजण हात वर करीत जांभई देत उठले व डोळे चोळीत चोळीत गाडीच्या दरवाज्यातून बाहेर निघू लागले.

अब्दुल चाचाने ही आपल्या बांगड्याचं पेटारं डोक्यावर घेतलं अन सीटवरून उठून उभा राहिला. तिनेही आपल्या बाळाला कडेवर घेतले अन सर्वांच्या पाठून उतरण्याचा प्रयत्न करू लागली. कानातून येणारं रक्त आता सुकले होते. आपला हात चेहऱ्यावरून फिरवीत, अंगावरचे व्रण झाकत ती लोकांच्या पाठी पाठी गाडीतून उतरण्यासाठी पुढे पुढे एकएक पाऊल टाकीत होती. हिंगोली शेवटचा स्टॉप असल्यामुळं गाडी आता डिपोत जाणार होती त्यामुळे सर्वजण गाडीतून खाली उतरत होते. सर्वजण गाडीतून खाली उतरले तीही गाडीच्या पायऱ्या उतरत होती तोच अचानक तिला चक्कर आली आणि पायऱ्यावरून गाडीच्या बाहेर कोसळली. खाली पडताच तिचे सहा महिन्याचे बाळ जोरजोरात रडायला लागले. ते बघून आजुबाजुचे माणसे धावत आली आणि तिला उठवून बाजूच्या एका झाडाखाली बसवले. दहा वीस पाऊल पुढे गेलेल्या अब्दुल चाचाच्या

लोकांची किलबिल ऐकू येते तो मागे वळून बघीत त्याच्या समोरून जाणाऱ्या एका व्यक्तीला तो विचारतो,

"क्या हुआ बच्चा?

लोक जमा क्यों हुये उधर? "

"अरे चाचा, गोरेगाव गाडीमेसे उतरते समय एक औरत गीरगई "

ते ऐकताच अब्दुल चाचा धावतच त्या झाडाखाली गेला. तिच्या शेजारी उभे असलेल्या माणसांना ओरडत म्हणाला,

"हटो रे बाजू , जावो आप आपणा काम करो.

इधर क्या तमाशा चालू है क्या देखणे को? "

अब्दुल चाच्याचा आवाज ऐकून सर्व आपआपल्या मार्गी लागले. अब्दुल चाचाने ओल्या कापडात गुंडाळून ठेवलेली पाण्याची बॉटल काढली आणि तिला देत म्हणाला,

"लो बेटा, पाणी पीओ थोडासा. थोडा तुम्हारे बच्चों को भी पीलाव "

वेदनेने कण्हत कण्हत तिने अब्दुल चाचाच्या हातची बॉटल घेऊन घटाघटा पाणी प्याले. जणू कित्येक दिवसाची तिला तहान लागली. एकदोन घोट बाळाच्या तोंडात घालून खाली बॉटल पुन्हा अब्दुल चाचाला दिली. पोटात पाणी जाताचं तिच्या अंगात थोडी तरतरी आली. घामाने ओलाचिंब झालेला चेहरा पुसीत ती आजूबाजूला नजर फिरवू लागली.

"किधर जाने का बेटा तेरेकू?

तेरा गाव कौनसा है? "

"कोण्हालं मलं !

पी...पिपरी....पीपरीलं जायचं.

व्हय, पीपरी हाय मव्ह माहेर..."

"तेरा नाम क्या है बेटा? "

"इमल, इमल हाये मव्ह नाव"

अब्दुल चाचला हात जोडीत ती म्हणाली,

" बाबा , मलं एस टीच्या सीटपुरते पैसे देता का?

लय उपकार व्हतील बाबा तुमचे"

" अरे बच्चा हात मत जोड. मैं देंगा तेरेकू पैसा. लेकिन तू ये तो बता की तेरी हालत ऐसी किसने की?

तेरा गाँव कौनसा है? "

ते ऐकून ती गप्प बसली तोंडातून एक शब्दही काढत नव्हती. तिला पुढे एक शब्दही न बोलता आज झालेल्या कलेक्शनातून पन्नास रुपयाची नोट काढून अब्दुल चाचाने तिला दिली.

"नाही बाबा !

पन्नास रुपये नको. मह्या माहेराचं तिकीट इथून फक्त इस रुपय हाये.

तेव्हढेच द्या मलं."

" रखले बेटा,

कुछ खाले. छोटा बच्चा तेरे पास है. रस्ते में काम आयेगा."

असे बोलत अब्दुल चाचा तिचा निरोप घेत निघून गेला.

रात्री पासून तिच्या पोटात अन्नाचा एक कणही नव्हता. हातात पैसे आल्यावर सकाळपासून भुकेने पोटात लागलेली आग शांत करण्यासाठी ती हॉटेल शोधू लागली. पुन्हा आपल्या बाळाला कडेवर घेऊन ती निघाली. बसस्टँडच्या थोडे बाहेर गेल्यावर, डावीकडे तिला एक हॉटेलची टपरी दिसली तिथे जावून तिने आपल्या बाळाला कडेवरुन उतरवत खाली बसवले. पाण्याने भरलेला मोठा मघ घेऊन, तोंडावर पाणी मारीत तोंड साफ केले. मघ खाली ठेऊन पदराने तोंड पुसीत हॉटेलवाल्याला म्हणाली,

"दादा, खायालं काय काय हाये? "

हॉटेलवाला तिच्याकडे बघून म्हणाला,

"काय देऊ?

भज्जे हायतं, पोहे हायतं, खिचडी भात हाये."

"दादा एक छेटाक भज्जे द्या मलं "

तसे हॉटेलवाल्याने तिला कागदात भज्जी दिली. दिलेली भज्जी हातात घेऊन ती खाऊ लागली. सोबत एक एक भजा तोडून आपल्या चिमुकल्याच्या पोटात घालू लागली. थोडे अन्न पोटात गेल्यावर तिला आता बरे वाटू लागले.

तितक्यात टणटण बेल वाजवून तिकीट मास्तर "चला पिपंरी वाले ........." आजूबाजूला बसलेल्या लोकांकडे बघून ओरडत होता आणि गाडी हळूहळू डेपोच्या चार नंबरच्या पलाटावर जात होती. ते बघून ती तडक त्या गाडीत जाऊन बसली. डोक्यात आभाळभर विचारांचे आणि यातनाचे काहूर घेऊन.

*****

# रुपया

आज त्याच्या मेलेल्या बापाला सावडण्याचा दिवस होता. त्याच्या बापाला ज्या ठिकाणी जाळले त्या ठिकाणी आज त्याचे सर्व आप्तजण जमलेले होते. तो मात्र त्या श्मशानभूमीत एका दगडाचा सहारा घेत शांत बसला होता. छिन्नवीन्न झालेल्या त्या राखेत त्याला आताही त्याचा बाप दिसत होता. जळालेली राख जमा करून त्याचे नातेवईक ती पोत्यात भरत होते. तो मात्र एका भलत्याच विचारात मग्न होता. त्याचे नातेवाईक ती राख व हाडे पोत्यात भरून नदीवर वाहण्यासाठी घेऊन गेले . तो मात्र एकटाच तिथे बसला होता .

हळूहळू सूर्य वर जात होता तसे उन आणखी तापत होते . तो (गण्या) मात्र त्याच्या विचारात गर्क होता. नदीवर गेलेल्या त्याच्या एका नातेवाईकांने आवाज़ दिला,

“गण्याssssssss

चाल घरी आता !”

“तुम्ही जा !

मी येतो मागून”

गण्या आपले दुःख गिळत आपल्या नातेवाईकाला म्हणाला.

थोडा वेळ तो तिथेच शांत बसून होता. पण डोक्यावर आलेला सूर्य त्याचे चमड़े सोलू पहात होता. तो उठून घराकडे निघतच होता तितक्यात जोरात वार्याची झुळूक आली आणि त्याच्या बापाला ज्या ठिकाणी जाळले होते त्या श्मशानभूमीतली राख उडायला लागली. ते बघून त्याचे लक्ष त्या राखेकडे गेले. त्याला तिथे काहीतरी चमकताना दिसले. ते बघून तो त्या राखेजवळ गेला. त्यानी त्या वस्तूला थोडे निरखून बघितले तर तो एक रुपया होता. तो रुपया तोच होता, जो चार दिवसापुर्वी त्याच्या मेलेल्या बापाच्या कपाळावर चिपकवला होता. त्या राखेमधला तो रुपया त्यांनी खाली वाकुन आपल्या मुठीत घेतला व घरच्या वाटेने चालायला लागला.

तो रुपया घट्ट पकडून तो घराच्या दिशेने निघाला. रस्त्यावरच्या एका बाभळीच्या झाड़खाली त्याचे मित्र पैसे खेळत होते . पाच सहाजण जमून ते पैशाचा खेळ खेळत होते. सर्वांनी एकएक रुपया काढायचा ते सर्व पैसे पाच सहा मीटर लांब फेकायचे. आणि हातातल्या पैशाने जो उडवायला सांगितला तो नेम धरून उडवायचा. पैसे खेळणारया त्याच्या मित्रांनी गण्याला घरी जाताना बघितले. त्यातल्या एकाने त्याला आवाज़ दिला,

“ये गण्या ! ये खेळायला”

त्याचा आवाज़ एकूण तो मधेच थांबला. आपल्या मुठीत बंद असलेला तो रुपया हळूच मूठ उघडून बघितला. आणि मान हलवली,

“येतो”

तो त्यांच्या जवळ गेला. आणि हातातला रुपया डाव खेळणारया मित्राकडे दिला. त्याच्या मित्रानी खेळण्यासाठी डाव फेकला अन् निशाना चुकला.

“आता गण्या तुझी बारी”

एकाने ते पैसे गोळा करून त्याच्या हातात दिले. गण्याने डाव फेकला.

“सांग कोणता मारू?”

“त्यो, काळा मार.....”

काळा रुपया तोच होता जो त्याने श्मशानातून आणला होता. तो त्याच्यावर जसा जसा नेम धरत होता. तसतसे त्याला मागचे आठवत होते. तो रुपया, ती दैना, आणि त्या रुपयाने घेतलेला त्याच्या बापाचा जीव.

असाच तो एकदा त्याच्या घरासमोर त्याच्या मित्रांसोबत भेंड्याचा खेळ खेळत होता. समोरून भेंड्या तुडवत सावकाराची बुलट त्याच्या घरासमोर उभी राहिली. कॉलर टाईट असलेला, हाताच्या बोटात मोठमोठ्या अँगूठ्या गळयात सोन्याची चैन, अंगावर अस्सल खादी व्हाईट कुर्ता. त्यांनी त्याची बुलट साइटला उभी करून गण्याच्या घराकडे धाव घेतली. गण्याची आई बाहेरच काम करीत होती. तो सावकार तिला रागाच्या भरात म्हणाला,

“ये लीले,

हाये का तुहा नवरा घरात?

गण्याची आई अचानक आलेल्या आवाजाने चीतरबीथर झाली. समोर सावकाराला बघून स्वतःला सावरित सावकाराला म्हणाली,

“होय ...

हायीत आत”

पुन्हा सावकारानी आवाज़ चढवला,

“ये लक्श्या बाहेर ये?”

सावकारचा आवाज़ एकुण गण्याचा बाप बाहेर आला. बाहेर सावकाराला बघून तोंड बारीक करून, हात जोड़ीत सावकाराला म्हणाला,

"रामराम सावकार !

कसं येणं केलं???"

सावकार त्याच्या कॉलरला पकडून म्हणाला,

" मादरचोदा , मह्याकडून व्याजाने घेतलेले पैसे वापस कधी देतोस?"

"देतो सावकार ......

अहो तीन वर्ष झाले दुष्काळामुळे शेतीत काहीच उरत नाही.मंग कुठून देऊ तुमचे पैसे??"

असे बोलल्यावर सावकाराने त्याला शिव्या देत मारायला सुरवात केली . गण्याची आई हात जोडून सावकाराला विनंती करीत होती . गण्या "सोडा मह्या बापाला " असे बोलत रडत होता. गण्याच्या बापाला सावकार मारताना सारी भावकी बघत होती पण सोडवण्याची हिम्मत कोण करत नव्हते . गावातल्या गरीब लोकांवर सावकाराचा वचकही तसाच होता. गण्याच्या बापाच्या कानाखाली पाचसहा थापडा मारल्यावर त्याला धमकावत म्हणाला,

"तुलं दहा दिवसाचा टाइम देतो...

जर पैसे नाही वापस केले तर तुही सगळी जमीन मह्या नावावर कर .."

असे धमकावून तो तिथून निघून गेला. शेजारी सर्वे एकमेकास बघून उलटसूलट चर्चा करीत होती. गण्याच्या बाप ओक्साबोक्सी रडत होता गण्याची आई त्याला समजावत होती. साऱ्या भावकी समोर गेलेली इज्जत गण्याच्या बापाला लाजिरवाणी वाटत होती. गावाच्या जवळ असलेल्या गण्याच्या तीन एकर शेतीवर खूप जनांचा डोळा होता. पण गण्याच्या बापाने तिला विकली नाही. पण आता सावकार ती जमीन घेतल्याशिवाय सोडणार नाही हे आता दिसू लागले. गण्याच्या आईने त्याला घरात नेले समजावले पण आता गण्याच्या बापाच्या डोळयासमोर तो झालेला अपमानच दिसत होता.

एक दिवस असाच रोजच्या सारखा दिवस उगवला पण तो दिवस रोजच्या सारखा नसून गण्याच्या आईसाठी अन् गण्यासाठी दुखाचा डोंगर घेऊन उगवला होता.नेहमी सारखी त्याच्या आईने घरातला सर्वे काम धंदा आवरुन शेताला निघण्याची तयारी करीत होती. गण्या आणि त्याचे मित्र घरासमोरच्या झाडावर डापडाप खेळत होते.गण्याचा बाप मात्र घरातच चिंताग्रस्त अवस्थेत बसला होता. त्याला बघून गण्याची आई जवळ जावून म्हणाली,

"आवं, कशाला येव्हढ टेन्शन घेता. यंदा होईल चांगला माल.

सारा माल इकुन घालू त्या सावकाराच्या मढ्यावर.......

थोडं जेवुन घ्या. मी धुण्ण धुवून येते. मंग आपण जावु रानात."

"जाय, ये.........

दरवर्षी आपण त्याच अशावर जगतो.

जाय ये लवकर धुवून."

बायको बाहेर गेल्यावर त्यांनी खिशात हात घालून पैसे आहेत का ते चापचून बघितले. बड्या मुश्किलने त्याच्या हातात एक रुपया लागला.तो रुपया घेऊन तो दुकानात निघाला. झाडावर खेळत असणाऱ्या गण्याने त्याला हटकले,

"बाबा कुठं चालले?"

"येतो गावातून...तू खेळ.

अन् तूह्या मायला सांग मी सरळ रानात जाणार हाये तुम्ही या मागून "

असे बोलून गण्याचा बाप सरळ दुकानात गेला. दुकानदाराने त्याला बघताच मागच्या थकबाकीसाठी छेडले,

"लक्श्या , आरं तुह्यावर लय उधारी झाली. थोडी थोडी देत जा.मलं पण शहरातून नगदीने सामान अनाव लागतं"

"हो दुकानदार , देतो लवकरच........"

असे बोलत त्यानी खिशातून एक रुपया काढला आणि दुकानदाराला उंदीर मारायची पुडि मागितली. हे बघून त्याच्या शेजारी उभा असलेला ग्राहक त्याला म्हणाला,

"काय लक्श्या... उंदीर जास्त झाले वाटते घरात?"

त्याला काहीही उत्तर न देता तो उंदराची पुडि घेऊन तिथून निघून तडक रानात निघून गेला. गण्याच्या मायची सर्वे काम झाल्यावर दोघेही शेतात निघायची तयारी करीत होते .

"ये आई , चाल लवकर.....

बाबा आपली शेतात वाट पहात असतील..."

"होय बुवा चाल, साड़ी कोणती घालू तेच कळत नाही मलं?"

"आई ती घाल ना , बाबांनी तूह्या बड्डेला आणली होती. ती लय भारी दिसते तूह्यावर."

"बरं ... घालते तीच. तूह्या बाबाला पण ती लय आवडते."

इकडे गण्याचा बाप ती उंदीर मारायची पुडि ग्लासात पाणी टाखुन खलवतो.पिऊ की नको या दुविधा मधे तो अडकतो,

शेवटी तो विष पितो...

थोड्या वेळाने गण्या अन् त्याची आई शेतात येतात. शेतात आल्यावर गण्याची आई गण्याच्या बापाला शोधण्यासाठी चौफेर नजर फिरवते पण तो तीला दिसत नाही.शेवटी गण्याला म्हणते,

"गण्या तुह्ये बाबा दिसत नाहीत. थोडं पुढं जावून बघ बरं हायत का ते?"

गण्या थोडं पुढं गेला आणि एक मोठी किंकाळी ठोकली,

"आई..ईsssssssss"

गण्याचा आवाज़ ऐकून त्याची आई थरथर कापायला लागली .नक्कीच काहीतरी विपरीत घडलं हे तीला कळून चुकलं .तिने डोक्यावरचे टोपले तसेच फेकले अन् धावतच गण्याच्या दिशेने निघाली.

"काय झालं रे गण्याsssss????"

"आई, बाबा बघ झाडाखाली बेशुध्द अवस्तेत पडले. तोंडाला फेस आलाय हातपाय थरथरतात."

विषाचा असर पन्नास टक्के झाला होता.आजुबाजुला कुणी नव्हते कुणाची वाट बघत बसले तर नवरा जीवाने जाईल त्यामुळे दोघानी कसेबसे त्याला तातडीने सरकारी दवाखान्यात घेऊन गेले.

दवाखान्यापर्यंत येईपर्यंत सत्तर टक्के विष त्याच्या शरीरात गेले होते त्यामुळे तो एका ठिकाणी बेशुध्द अवस्थेत नुसता कण्हत होता. ती opd मधे जात होती पण कंपाउंडरने तीला अडवले,

"अहो बाई ..... अगोदर केस पेपर घ्या नंतर आत जा !"

"अहो साहेब....मह्या नवऱ्याने विष पीले आहे . त्याला लवकर बघा!"

"त्यां पेशन्टला इथेच सोडा आणि या समोरच्या रांगेत उभे राहून केस पेपर काढा.

जोपर्यंत केस पेपर काढणार नाही तोपर्यंत डॉक्टर तुमच्या नवऱ्याला हात सुद्धा लावणार नाही.

"गण्या, तुह्या बाबाकड लक्ष ठेव. मी लाइनमधे उभी राहून पेपर काढते"

"हो आई... तू केस पेपर काढ....."

गण्याची आई केस पेपर काढण्यासाठी लाइनमधे उभी राहिली पण तिचा सारा जीव नवऱ्यात होता. ती सारखी त्याच्याकडे बघत होती अन् लाइन जशी पुढे सरकत होती तशी पुढेपुढे जात होती . शेवटी तिचा नंबर आला. सिस्टर तीला म्हणाली,

"पेशन्टचे नाव सांगा?"

"लक्ष्मण "

"वय"

"बत्तीस "

"हं.... हा घ्या केस पेपर आणि एक रुपया द्या "

"एक रुपया??????

ना......नाही मह्याकड. थांबून दिला तर नाय चालणार का?"

"अहो नाही बाई.......

पहिला एक रुपया द्या अन् हा केस पेपर घेऊन जा."

"अहो बाई नवरा मरेल हो माझा. त्यांनी विष पीले, त्याला ताबडतोब डॉक्टरला दाखवायचे. असे करू नका . मी तुमच्या पाया पड़ते."

"ओ बाई, पाया वैगेरे पडू नका. तुम्हांला असाच केस पेपर दिला तर माझी नौकरी जाईल. जा अगोदर एक रुपया द्या आणि हा केस पेपर न्या.

चला मागच्या आजी......या , नाव सांगा??"

आता गण्याच्या आईला काही सुचत नव्हते. डॉक्टर जवळ येऊनही ती इलाजाच्या खूप लांब होती. ओपीडीच्या बाहेर बसलेल्या पेशन्टला ती विनवत होती व एक रुपया मागत होती पण तीला कुणीच एक रुपया देत नव्हते.हे बघून गण्याने दवाखान्याबाहेर धाव घेतली.बाहेर गेल्यावर तो दिसेल त्याला एक रुपया मागत होता पण त्याला कुणी देत नव्हते. शेवटी एका हॉटेलच्या मालकाला मागितले,

"अहो काका, मला एक रुपया द्याहो. मह्या बाबा दवाखान्यात आहे डॉक्टर एक रुपया मागतो"

"देतो, पण एक काम करावं लागल.

ते भांडी दिसतात ना...ती घासून द्यावी लागतील."

क्षणाचाही विलंब न गण्यानी भांडी घासायला सुरुवात केली. भांडी जास्त होती अन् गण्या भांडी प्रथमच भांडी घासत होता पण त्याच्या डोळ्यासमोर तडफत असलेला त्याला त्याचा बाप दिसत होता. भांडी घासुण घासुण गण्या पार कमरेपासून खाली ओलाचिंब झाला. अर्ध्या घंट्यानंतर सारी भांडी घासुण गण्या हॉटेल मालकाजवळ गेला.हॉटेल मालकाने त्याला एक रुपया

दिला.तो रुपया मुठीत घट्ट पकडून तो दवाखान्याच्या दिशेने पळत सुटला. तो दवाखान्यात गेला पण ज्या ठिकाणी त्याचा बाबा बसला होता तिथे त्याचा बाबा नव्हता. त्याने ओपीडीमधे जाऊन बघितले तिथेही त्याचे आई बाबा नव्हते.त्यांनी आजुबाजुला सर्वांना विचारले पण कुणीच त्याला सांगितले नाही. शेवटी बाहेर बसलेल्या एका वेडसर म्हातारयाला त्यांनी विचारले,

"आज्या......इथं महे आई बाबा होते ते कुठं गेले."

"कोणता त्यो ज़हर पीलेला माणूस का?"

"हो अज्या"

"त्याच्या गावचे तीन चारजण आले होते. त्याला उचलून घेऊन गेले"

"कुठं नेलं आज्या त्यांना"

"काय माहीत नाय...

ये पोरा , एक रुपया देनं, पहाटपासून उपाशी हाये मी काही खाल्ल नाय देन रुपया"

"नाही ......., मह्याकडं नाही रुपया !"

असे बोलून गण्यान तेथून धूम ठोकली. सरकारी दवाखान्यापासून त्याचे गाव तीन चार किलोमीटर.तो सारे रानं पालथी घालत गावाच्या दिशेने पळतच सुटला. माझा बाबा कसा आहे..माझी आई काय करत असेल.. गावातल्या लोकांनी जिल्ह्याच्या दवाखान्यात तर नेले नसेल ना.. असे एक ना अनेक प्रश्नाचा भडिमार त्याच्या डोक्यात होत होता. तो एक रुपया हातात घेऊन पळतच होता.न थांबता, न थकता.शेवटी तो गावात शिरला. गावातले सारे लोक त्याच्याकडे मायेच्या नजरेने बघत होते. आज लोक माझ्याकडे असे का बघतात. हे त्याला कळत नव्हते.शेवटी तो घराजवळ आला. त्याच्या घराभोवती खूप लोक जमले होते. ते बघून त्याची छाती धडधडायला लागली तो त्या गर्दीला सारून पुढे गेला आणि ओक्साबोक्सी रडायला लागला.त्याचे वडील गेले होते.संपले होते. तो अनाथ झाला होता.पाच सहा बायका त्याच्या आईचे कुंकू पूसित होत्या, बांगड्या फोडीत होत्या.त्याची आई मरगळ होऊन थंड पडली होती.भावकितल्या काकांनी त्याच्या बाबाला भिंतीला टेका देऊन बसवले. आणि कपाळावर एक रुपया चिपकवण्यासाठी एक दुसऱ्याला विचारत होते. पण कुणाकडेच एक रुपया नव्हता. शेवटी गण्याने आपल्या बंद मुठीतला एक रुपया खोलला आणि काकाकडे दिला. काकांनी तो एक रुपया त्याच्या बाबाच्या कपाळावर चीपकवला...

"ये गण्या.....उडवना त्यो काळा रुपया.किती येळ नेम धरतूस."

सर्वे हसायला लागतात. गण्या मात्र अंगातले सारे बळ एकवटुन निशाना धरतो.

कारण त्याच रुपयामुळे त्याच्या बापाचा जीव गेला. हाच तो रुपया जो त्याच्या बापासोबत जळून सहीसलामत वापस आला. त्याने सारी ताकत लावून नेम मारला. निशाना लागला.

तो जिंकला तो जिंकला

सारे काही हारून तो जिंकला.....

“रातीला भित नाही गडद अंधारं

इखाला पीत नाही माणूस झुंजारं ।

हरपलं सुख, पोटं मागे भाकरी....

जगणं झालं भारी,कर्ज सावकारी

फिटता फिटना दुःख आलं डोईवरी ॥

करपल्या रानाचा काय भरवसा ठेउ

उदरात नाही माझ्या, तुला काय देऊ ।

रातदिस उपाशी मी करितो चाकरी

जगणं झालं भारी,कर्ज सावकारी

फिटता फिटना दुःख आलं डोईवरी ॥

मन धावे सैरावैरा भेटना विसावा

दारिद्री कलंक कुणी त्याचा रं पुसावा ।

शिवना त्याला ते सुख अहंकारी

जगणं झालं भारी,कर्ज सावकारी

फिटता फिटना दुःख आलं डोईवरी ॥“

# तिसर परन्या

डाळणावरच्या कोमड्यानं जसा बाग दिला तसा पिंट्या ताडकन बाजेवरून उठून जागा झाला. आज त्याला सकाळची माळहिवऱ्यावरून जाणारी सागद गाडी कुठल्याही परीस्तीतीत पकडायची होती. तो ताडकन उठून मायच्या बाजेजवळ जावून तिला हलवित म्हणाला,

"ये माये sss....!

मायेव्व्व्व... आवं उठ ! मलं न्याहरी चहा बनव अन पाणी ठेव आंघोळीलं.

आये उठ लवकर ... ये माये sss ! "

डोळे चोळीत चोळीत पिंट्याची माय उठली अन तोंडाची पिपाणी वाजवत वाजवत चुलीकडे जाऊ लागली,

"काय माय मेलं फुटकं नशीब मव्हं ! वर जायची येळ आली तरी याचं लहान लेकरासारखं समदं कराय लागते. नशीबाचे भोग आणिक काय?

सून काय घरात येत नाही आली तं टिकत नाही.

" आवं मुकी बस नां ! रामाच्या राम पाहऱ्या चालू झालं का तूह.

त्यासाठीच चाललोयना सागदालं. "

"हजार पोहरीनी तुलं नापसंत केलं आता हीच कोणती रंभा भेटणार हाये तुल. दोन दोनदा लगीन करून एकपण नांदत न्हाई तुह्याजवळ. नुसता नाताचा फास अन ह्यो असा गळयात ल्योक.."

पिंट्यानं मात्र म्हातारीच्या बोलण्याकडे कानझाक केली अन सागदला जायाच्या तयारीला लागला. पाच सहावेळा दाढी करून कागदात गुंडाळून ठेवलेली सूपरमेक्सची ब्लेड काढली, एका डब्यात रांजणातले पाणी घेतले, घरात जाऊन पत्राच्या आडोशाला ठेवलेला फुटलेल्या आरश्याचा तुकडा काढला अन बाहेर उजेडात जाऊन खाली मांडी घालून दाढी करण्यासाठी बसला.

वावरातल्या धसाडासारखी कडक अन जाड झालेल्या दाढीवरून पाण्याने ओला केलेला हात फिरवीत दाढीच्या काळया केसांचे पांढऱ्या केसात रूपांतर झालेल्या अन जर्जर झालेल्या आपल्या चेहऱ्यावर निरक्षण करीत तो मनात विचार करीत होता, हाच कुरूप दिसणारा चेहरा एकेकाळी कोवळा व काळयाभोर दाढीच्या केसांनी पाणीदार दिसत होता. आज काय अवस्था झाली या चेहऱ्याची. दाढी करता करता त्याला वयाच्या अठराव्या वर्षी पहिल्यांदा बघायला गेलेल्या मुलीची आठवण झाली.

में महिन्यांचे ते दिवस होते. नुकताच वातावरणात बदल झाला होता. वारा सोsss सोsss करीत सुसाट धावत होता. आकाशात पांढरे, काळे ढग वाऱ्याच्या वेगाने धावत होते. त्या दिवशी पिंट्या अन त्याची म्हातारी (माय ) घराचे कवाड लावून शांतपणे घरात बसले होते. तितक्यात त्याच्या दरवाज्यावर धाड धाड हाताची थाप मारीत मरीबा ओरडला,

"ये... पिंट्याची म्हातारी हायस का घरात "

"कोण हाये रे बाबा बाहीर"

"मी मरीबा हाय "

मरीबा नाव ऐकताच पिंट्या धावतच गेला अन दरवाजा उघडला. मरीबा हा पिंट्याचा चुलत चूलता होता. मरीबा वसमतला एका सावकाराच्या शेतात सालाने होता. कधी अधूनमधून त्याची गावाकडे चक्कर राहत असे. पिंट्याचा बाप त्याच्या लहानपणीच वारला होता. त्यामुळे पिंट्याला त्याच्या मायनेच लहानाचे मोठे केले.

" काय हो मरीबा भौजी ! कसे काय येणं केलं एव्हढ्या वाऱ्यावावधाणात? "

"लेकीच्या गावी गेलो होतो. तुमच्याकड जरास काम व्हतं म्हणून केली जरा वाट वाकडी."

हे ऐकून पिंट्याची म्हातारी आश्चर्यानं मरीबाकडे बघून म्हणाली,

"आमच्याकडं??? आन काय काम काढलं बाप्पा? "

"मह्या बटवाडीच्या मेहुण्याची पोरगी हाय लग्नाची. अवंदा तिचं लगीन करायचं. तुह्या पिंट्यालं ती लय शोभून दिसलं. आता पिंट्यालं बाप न्हाई. ह्या गोष्टी आता आम्हालं करावं लागतील. आता तू बोलशील तर मी बोलतू आपल्या पिंट्यासाठी. "

हे ऐकून पिंट्या तर मनातल्या मनात खूपच खुश झाला. ' माझ्यासाठी मरीबा काकांनी मुलगी बघितली म्हंजी आता मव्ह लगीन होणार' असे तो मनोमन विचार करू लागला. मरीबाचे हे बोल ऐकून पिंट्याची मायही खूपच खुश झाली. खरेतर पिंट्याच्या मायला त्याच्या लग्नाचीच चिंता खात होती. घरात कुणी माणूस न्हाय अन बाईमाणसांन कसं कुठं जावं लग्नासाठी मुली बघायला. पण मरीबाचे हे बोल ऐकून भावकी कशी का असेना पण अडीअडचणीला धावून येते हे तिला पटले. कसेतरी पिंट्याचे लग्न करून दिले की मंग मी मोकळी झाले. त्यामुळे चालून आलेली संधी तिला हातची जाऊद्यायची नव्हती म्हणून लगेच ती मरीबाला म्हणाली.

"मरीबा भौजी, तुम्हाला तं संबधं ठाऊक हाये. घरात मी एकटी बाईमाणूस, त्यामुळे पिंट्याच्या लग्नाचं तुमच्या शिवाय कोण बघणार. मह्यासाठी तुम्ही बोलाल ती पूर्व दिशा. तुम्ही थोडं मह्या पिंट्याच गांढ करणार. "

हे ऐकून मरीबा आपल्या मिशाला पीळ देत म्हणाला,

"ठरलं तर मंग, आपण उद्याच जाऊ पोरगी बघायला बटवाडीत. "

पिंट्याच्या मायचा होकार मिळाला अन मुलगी बघायचा उद्याचा दिवस नक्की ठरला. त्या रात्री पिंट्याला रात्रभर झोप आली नाही. ' मरीबा काकाच्या मेहुण्याची मुलगी कशी असेल?? छे छे आता मरीबा काकाच्या मेहुण्याची मुलगी कशालं बोलायचं तीलं. ती तर आता मही बायको होणार...! पण ती गोरी असेल का काळी??? कोणत्या हिरोईनवानी दिसत असल?? तील मी पसंत तर येईन ना?? ' असे एक ना अनेक प्रश्न व विचार पिंट्याच्या मनात घोळत होते. पण ह्या साऱ्याचे उत्तर त्याला बटवाडीतच गेल्यावर मिळणार होते. शेवटी तो दिवस उजाडलाच, सकाळीच उठून पिंट्या यंका वारकाच्या घरी जावून दाढी कटिंग करून चीकना चोपडा होऊन आला. पहाटे कोवळया उन्हातच मरीबा, पिंट्या अन पिंट्याची माय बटवाडीच्या दिशेने रवाना झाले. पिंट्याच्या गावावरुन चार पाच घंट्याचा आडरानातून जाणारा रस्ता पार करीत तिघेही पुढे पुढे जात होते. कधी जाऊ अन कधी नाही असे पिंट्याला झाले होते. पण काय करावं, हा चार पाच घंट्याचा रस्ता पार करावाच लागणार. काळया पांढऱ्या ढगांतून डोके बाहेर काढून सूर्य हळूहळू तप्त होत होता. लांब गेलेल्या सावल्या आता जवळ जवळ येत होत्या. अथक तीन चार तास चालून चालून तिघांच्याही अंगातून घामाचा पाट वाहत होता. एक डोंगर चढून वर आल्यावर मरीबाने एका गावाकडं बोटाने इशारा करून पिंट्याच्या मायला सांगितले,

" ती बघा आली बटवाडी, आता दहापंधरा मिनटं चालायचं फक्त"

"आली माय एकदाची बटवाडी. मह आंग तर उन्हानं अन घामानं लाहीलाही झाले"

पदराने तोंडावरचा घाम पुसत पिंट्याची माय बोलली. पिंट्यासाठी हे सारं नवीनच होतं. पिंट्या जास्त कुठे बाहेर जात नसे. कुळातले दीड एकर वावर वाट्याला आले होते. ते पेरायचे अन गावात रोजमजुरीचे भेटेल ते काम करून पोट भरायचे. तसा पिंट्या स्वतचे गाव सोडून कुठं गेलाच नव्हता. दुसऱ्याच्या गावात जायची ही त्याची पहिलीच वेळ होती आणि तीही स्वतःसाठी मुलगी बघायला...

रान मागे टाकून आता तिघेही गावात शिरले होते. मरीबा आता झपाट्यानं पावले टाकीत पुढे पुढे जात होता आणि त्याच्या मागे मागे दोघे माय लेक. रस्त्याने जाताना गावातील सारेजन आपापल्या घरातून तिघांना बघत होते. त्यांना बघून पिंट्या लाजून कावऱ्याबावऱ्या नजरेने पुढे पुढे जात होता. शेवटी मरीबाच्या मेव्हण्याचे घर आले. सर्वांनी एकमेकांना नमस्कार केला. हातपाय धुवायला पाणी दिले. पिंट्या अन त्याची माय घरात चटईवर बसले. थोड्या वेळात चहा घेऊन मुलगी आली तसा मरीबा पिंट्याला म्हणाला,

"पिंट्या , ही पाह्य तूही बायको. चांगली खालून वरून न्याहाळून घे आत्ताच. नंतर नको काकाच्या नावानं बोट मोडू. "

"काय काका तुम्हीपण ...... काही बिन बोलता.! "

पिंट्या असे बोलून हळूच लाजऱ्या नजरेने तिच्याकडे बघू लागला. पिंट्याने मनात स्वतःच्या बायको विषयी जसे चित्र तयार केले होते त्यापेक्षाही ती मुलगी सुंदर होती. पिंट्याला तीला पाहता क्षणीच पसंद पडली. पिंट्याच्या मायने तर तीला बघून देवाला नवसच बोलला की, ' देवा काही कर पण हीच मही सून होऊदे '

पिंट्याची नजर तर तिच्या चेहऱ्यावरुन हटतच नव्हती. ते बघून मरीबाचा मेहुणा खोकत पिंट्याला म्हणाला,

"मंग पाव्हनेबुआ... काय !

पसंद हाय का न्हाय आमची पोरगी तुम्हांलं "

"हो... पसंद हाये मलं .."

लाजत मान खाली घालून पिंट्या म्हणाला.

"आणि बाई तुम्हांलं.....? "

"व्हय....मलं बिक पसंद हाये तुमची पोरगी."

"ठरलं तर मंग. मरीबा दाजी काय म्हणणं हाय तुमचं. कव्हा ठरवायचं लगीन. "

"आम्ही कव्हापण तयार हावो दाजी तुमचं म्हणणं काय ते सांगा आम्हालं. काय हो पिंट्याचे माय? "

"हो भौजी."

"बरं, थांबा मी घरच्यांचा ईच्यार घेऊन कळवतो."

असे बोलून मरीबाचा मेहुणा आतल्या घरात गेला. थोड्या वेळात मरीबालाही आत बोलवले. आतमधे काय चर्चा होत असेल याचा विचार करीत दोघे मायलेक बाहेर बसून त्यांची वाट पाहत होते. थोड्या वेळाने ते दोघेही बाहेर आले ते बघून पिंट्याची माय मरीबाला म्हणाली,

"मंग काय ठरलं भौजी तुमचं.??? "

"पिंट्याची माय, पोरीच्या बापाचं अन मायचं म्हणणं हाये की लगीन या दोन तीन दिवसातच एखाद्या मंदिरावर लावायचं. जर तुमची तयारी असलं तर ठीक हाये. नाहीतर आम्ही दुसरा पोरगा बघू आमच्या पोरीसाठी. "

"दुसरा पोरगा.. न्हाय न्हाय. हाय मंग आमची बिक तयारी. "

पिंट्या उभा राहून मरीबाला बोलला तसा त्याच्या मायने त्याचा हात धरून त्याला गप्प करण्याचा प्रयत्न केला अन मरीबाला बोलली.

"मरीबा, पोरगी तर आमच्या माय लेकाच्या लय पसंद हाय पण दोन दीसात कशी तयारी व्हईल.? "

"यात तयारी काय करायची पिंट्याची माय? तुमचीपण परिस्तिथी बेताची अन यांचीपण. कशाला खर्चाच्या भानगडीत पडायचे? आपल्या भावकी मधील तीन चार जन बोलवू अन यांच्या भावकी मधून तीनचार जन अन उडवून टाकू लग्नाचा बार एखाद्या समाज मंदिरावर."

यावर दोघा माय लेकाने मान हलवली अन पिंट्याचे लग्न दहा बारा वऱ्हाडाच्या साक्षीने एका मंदिरात लागले. पिंट्याच्या मायला मनासारखी सून मिळाली आणि पिंट्याला मनासारखी बायको आणि तीही इतक्या लवकर, त्यामुळे दोघेही माय लेक खूपच आनंदी होते. नवीन सुनेचा घरात प्रवेश झाला दोन तीन दिवस अगदी आनंदात गेले. घरात आनंदाचे वातवरण होते. एक दिवस अचानक पिंट्याच्या बायकोला उलट्या झाल्या अन चक्कर येऊन खाली पडली. हे बघून पिंट्याने आणि त्याच्या मायने ताबडतोब तिला दवाखान्यात नेले. डॉक्टरने तिला तपासल्यावर बीमारी कळाली. बाहेर जावून डॉक्टर पिंट्याला हसत म्हणाला,

"अभिनंदन,

तुम्ही बाबा होणार आहात. चार महिने झाले दिवस जावून तुमच्या बायकोला "

हे ऐकून दोघा माय लेकाच्या पायाखालची जमीनच सरकली. चार दिवस झाले नाही सून घरात आली आणि चार महिन्याचा गर्भ पोटात. मरीबाने अन त्याच्या मेहुण्याने आपल्याला फसवले हे आता त्यांच्या लक्षात आले. लग्नाला इतकी घाई कां करीत होते हे त्यांना आता कळून चुकले. डॉक्टरचे हे बोल ऐकून पिंट्याची माय सुनेजवळ जावून तिला शिव्याशाप देऊ लागली.

"अगं ये मेले. मुडदा बसवला तुझा. कोण्हाच पाप आहे ग हे?

आमच्या गळयात बांधतेस काय. "

पिंट्याची गावात थु थु झाली. त्यांच्या पाठीमागे सर्वजण त्याला आणि त्याच्या मायला नावे ठेऊ लागली. पोरीचं प्रकरण तिच्या नवऱ्याला अन सासूला कळले हे ऐकून तिचा बाप आणि मरीबा ताबडतोब तिच्या घरी आले. मरीबाला चांगलच ठावूक होते की, बाई (पिंट्याची माय) एकटीच आणि गावात कुणी वाली न्हाय पोरगा साधा भोळा. मेहुण्याची इज्जत जाण्यापेक्षा या माय लेकाच्या पदरात टाकलेलीच बरी. मरीबाने अन त्याच्या मेहून्याने त्यांचे हात पाय जोडून तिला व तिच्या पोराला संभाळण्यासाठी विनंती केली. अखेर माय लेक त्या पोराला अन तिला सांभाळायला राजी झाले.

दिवसांमागून दिवस जात होते. पिंट्याचा संसार आता आनंदात चालला होता. पिंट्या आता दोन मुलाचा बाप बनला होता एक त्याचं अन दुसर कुणाचं का असेना पण नाव आणि गाव तर पिंट्याचच होतं. पण त्याच्या सुखी संसाराला कुणाची नजर लागली कुणास ठावूक. त्याची बायको एका रोगाने मरण पावली आणि दोन पोरांची जबाबदारी त्याच्या मायवर आली.

एका वर्षाच्या आत पिंट्याने दुसरे लग्न केले. पण दुसऱ्या बायको सोबतचा त्याचा संसार अर्ध्या वाटेवरच मोडला. दुसरी बायको त्याला फार रागीट अन भांडखोर मिळाली. सासू सोबत आणि नवऱ्या सोबत तिचे पटत नव्हते त्यामुळे पिंट्याला तिसरा वारीस देऊन तिने त्याच्यासोबत फारकत घेतली. आता पिंट्याच्या गळयात तीन मुलांचा झोपाटा होता. पिंट्याची माय त्या तीन लेकरांना सांभाळून सांभाळून हैरान झाली होती त्यामुळे कशी का असेना पण पिंट्याला बायको पाहीजे होती. जी त्याच्या तीन पोरांना सांभाळेल आणि घरात काम करेल. त्यामुळे गंध्रवाचे जिकडे स्थळ असेल तिथे जावून मुलगी बगून येत असे पण पिंट्याचे तीन तीन मुले बघून त्याला

कुणीही आपली मुलगी देत नव्हते. पिंट्यानेही हार मानली नाही. दोन तीन वर्ष नव्हे, तर तो गेल्या दहा वर्षापासून ‘तिसर परन्या’ बनून बायको बघत होता.

" आर आवर नं लवकर, भिंगात पाह्यलं माय केधोकाचं.

गाडी गेली तर पोरगीबिक हातनं जायची"

म्हातारीच्या ओरडण्याचा आवाज ऐकून पिंट्या भानावर आला. दाढी केलेल्या ओल्या तोंडावर गळ्यातला रुमाल पुसत घरात गेला. खुंटीला अडकवून ठेवलेला कमीज हातात घेतला. त्याला दोन्ही हातात घट्ट पकडून जोरात तीन चार वेळा झटकला आणि मानेतून घालून अंगावर चढवला. कमीजातल्या खिशातली एक बिडी काढून चुलीतल्या विस्तवाने पेटवली व त्याच्या मायला म्हणाला,

"माँ..... , भाकरी बांध लवकर मी येतो सदाच्या घरून. त्याचं आटपलं का नाही ते बघतो."

"हँ... जाय आन त्या पारावरच्या देवळात जावून त्याच्यावर डोस्कं ठेऊन त्यालं बोल, या येळी तरी जमू दे म्हणून. तूहा आन तुह्या पोराचा नुसता इट आला मलं."

म्हातारीचे असे बोलणे ऐकून पिंट्या पाय आपटीत सदाच्या घराकडे निघून गेला. पिंट्यासाठी यावेळचे सागदचे स्थळ सदा घेऊन आला होता. सदाचा साडू सागदला राहत होता.

सदाच्या साडूच्या भावकीतल्या एका मुलीला तिच्या सासरच्यांनी टाकून दिले होते. दहा बारा वर्ष नवऱ्यासोबत संसार करूनही तिला मूल होत नव्हते म्हणून तिला वांझ आहे म्हणून टाकून दिले आणि गरीब म्हाताऱ्या माय बापाला एक जवान मूल सोपवत तिचा नवरा दुसरे लग्न करायला मोकळा झाला. सदाच्या साडूने सदाला तिच्याविषयी सांगताच सदाने त्याला पिंट्याचा विषय छेडला आणि तिच्या माय बापाला सांगून मुलगी बघायला जायचे नक्की झाले.

"आरं ये सदा , उठला का नाही अजून.. चाल, लवकर निघायचं आपल्यालं. नाहीतर सागद गाडी निघून जाईल. "

"कोण पिंट्या....?

हे काय, समदं झालं... तुह्या घराकडंच येत होतो."

"येहरी कव्हा उठणार नाहीत भाऊजी, पण बायको बघायची म्हणलं की पाहटच उठून रेडी होतात."

दोघांचे बोलणे तोडीत, चुलीत घातलेल्या लाकडांचा ज्वाळ करण्यासाठी फुंकणीने फुकंत फुकंत सदाची बायको हसत पिंट्याला म्हणाली. सदाच्या बायकोचे असे बोल ऐकून पिंट्याही हसत हसत तीला म्हणाला,

"काय वहिनी तुम्ही पण, पाहटं पाहटं मीच भेटलो का तुम्हांल.हिच्या सोबत तरी लगन व्हईल म्हणून देवालं नवस बोला बावन नारळाचा. कंजुशी करू नका"

तिघेही हसतात, सदा आणि पिंट्या तयारी करून सूर्य उगवायचा आतच गाव सोडतात. अर्धा तास माळ रानातून चालत चालत दोघेही माळहिवरा फाट्यावर येतात. हिंगोलीवरून सूटणारी सागद गाडी काही क्षणातच त्यांच्याजवळ येते. दोघेही त्या गाडीत चढतात. गाडी सागदकडे सुसाट धावत होती. पिंट्या गाडीच्या खिडकीतून बाहेर बघत स्वतःच्या विचारातच गर्क होता. तो मनोमन देवाला प्रार्थना करीत होता, ' देवा भेटू दे रे एकदाची बायको '

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. संजय बनसोडे यांचं ई साहित्यवरचं हे चौवं पुस्तक.**

संजय बनसोडे एक तरूण लेखक आहेत. अनेक नियतकालिकांत ते लिहीत असतात. त्यांची ई साहित्य व्यतिरिक्तही अनेक पुस्तकं प्रकाशित झाली आहेत. पण ते केवळ लिहून थांबत नाहीत. ते काही सामाजिक बांधिलकीतून लेखन करतात. समाजाला जागं करणारं वास्तव त्यांच्या लेखणीतून साकार होतं. समाजाला अस्वस्थ करणारी त्यांची लेखणी आहे. तळागाळातील लोकांना माणसासारखं जगता यावं म्हणून ते काम करतात. त्यांच्या सामाजिक विचारांतून त्यांची लेखणी त्यांना लिहायला लावते. आणि ते अत्यंत मेहनतीने आपल्या लेखनाचा कस वाढवत नेत आहेत. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत.

नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ वागळे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान